भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३७ ■ बुधवार ९ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
Post Regd.No./DHL/53/24-26

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

### प्रश्न सोडवायचे नाही तर अंतरवालीत येऊ नका

## पंधरा पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही जरांगेंचा सरकारवर निशाणा, गोगावलेंना इशारा

**मुंबई, दि. ८ : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरू असून सरकारसोबत मागण्यांवर चर्चा सुरू आहे. सरकारकडून काही मागण्या मान्य झाल्याचा दावा करण्यात येत असताना मनोज जरांगे-पाटील यांनी मात्र सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारने पंधरा पैकी एकही मागणी मान्य केलेली नसल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी त्यांनी मंत्री उदय सामंत आणि भरत गोगावले यांच्या वक्तव्यांवरही प्रतिक्रिया देत सरकारला इशारा दिला.**



**मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत एकेरी भाषेचा वापर करू नये, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला. चुकीच्या गोष्टीला चुकीचे म्हणू नये का, असा प्रश्न त्यांनी केला.**

उपमुख्यमंत्री शिंदेंनी चूक केली असेल तर ती कबूल करा. त्यांचे म्हणणे ऐकून आमचे प्रमाणपत्र रद्द का केले, असा प्रश्न जरांगे-पाटील यांनी उपस्थित केला. सरकारमधील काही मंत्री आंदोलनाबाबत वेगवेगळी भूमिका घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने १५ पैकी १२ मागण्या मान्य केल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात एकही मागणी मान्य झालेली नाही, असा दावा जरांगे-पाटील यांनी केला. पंधरा पैकी १२ मागण्या मान्य झाल्या, असे सांगितले जाते. मात्र, याला न्याय देणे म्हणत नाहीत. तुम्ही गरीबांचे नुकसान केले असून मराठा समाजाला पश्चात्तापाच्या उंबरठ्यावर आणले आहे, अशी टीका त्यांनी केली. सरकारकडून शिष्टमंडळाच्या माध्यमातून (पान ४ वर)

### पंतप्रधानांच्या कार्यक्रम स्थळी सुरक्षेचा भंग, दोन ताब्यात

मुंबई, दि. ८ : वांद्रे-कुर्ला संकुलातील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रम दरम्यान सुरक्षेशी संबंधीत गंभीर प्रकार समोर आला आहे. मुंबई पोलिसांनी कार्यक्रमस्थळाच्या परिसरातून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. त्यापैकी एका तरुणाकडे बनावट पंतप्रधान कार्यालयाचे बनावट ओळखपत्र आढळल्याचे सांगण्यात येते. त्याच्यासोबत असलेल्या खासगी बॉडीगार्डकडे बंदूक आढळल्याचीही माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांनी रोहन पारेख या २४ वर्षीय तरुणाला पंतप्रधानाचा कार्यक्रम अशलेल्या परिसरातून ताब्यात घेतले. तो स्वत:ला पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी असल्याचे सांगत (पान ४ वर)

## डीजे, लेझर लायटिंगवर कायमस्वरूपी बंदीची मागणी महानगर नागरी हक्क संघर्ष समितीचे पो.ना निवेदन

**धुळे,दि.८-गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरात मोठ्या प्रमाणावर होणारा डीजे, डॉल्बी तसेच लेझर लायटिंगचा वापर नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत असल्याने डीजे व लेझर लायटिंगवर जिल्ह्यात कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी मागणी महानगर नागरी हक्क संघर्ष समितीतर्फे पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली. याबाबत समितीचे निमंत्रक सदस्य कैलास हजारे यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा समितीचे सरचिटणीस रमेश पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि.८ सप्टेंबर २०२६रोजी धुळे जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांना निवेदन देण्यात आले.**



निवेदनात मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देत, मिरवणुकीमध्ये यापुढे डीजे वाजविता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण आदेश देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार राज्य सरकारच्या गृह विभागानेही संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना डीजे वाजविण्यास परवानगी देऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले आहे. या आदेशाची धुळे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात (पान ४ वर)

## अडूसष्ट ग्रा.पं.च्या सरपंचपदांचे आरक्षण जाहीर राजकारणातील इच्छुकांच्या हालचाली वाढल्या

**साक्री, दि.८(प्रतिनिधी) साक्री तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बिगर अनुसूचित क्षेत्रातील ६८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे सन २०२५-२०३० या कालावधीसाठी प्रवर्गनिहाय आरक्षण मंगळवारी (दि.८) निश्चित करण्यात आले. तहसील कार्यालयात दुपारी ३ वाजता तहसीलदार साहेबराव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची सोडत पार पडली. आरक्षण जाहीर होताच इच्छुक उमेदवार आणि स्थानिक राजकीय गटांच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

यावेळी प्रांताधिकारी रोहन कुवर, अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर आणि नायब तहसीलदार किरण कोठावदे उपस्थित होते. ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेनुसार सरपंचपदांचे आरक्षण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण अशा चार प्रवर्गांमध्ये निश्चित करण्यात आले. आरक्षण सोडतीकडे ग्रामस्थांसह विद्यमान व माजी ग्रामपंचायत सदस्य, संभाव्य उमेदवार, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते. आरक्षणाचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर अनेक गावांतील इच्छुकांच्या राजकीय हालचालींना आता प्रत्यक्ष सुरुवात होण्याची चिन्हे आहेत.

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी लोणखेडी, कळंभीर आणि वसमार या तीन ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे आरक्षण निश्चित झाले आहे. तर १२ ग्रामपंचायती अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी अष्टाणे, कोकले, आयणे (मळखेडे), मलांजन, निळगव्हाण, म्हसदी (प्र. नेर), नागपूर (व), नाडसे, शेणपूर, अक्कलपाडा, बळसाणे आणि विटाई आरक्षित (पान ४ वर)



## दोंडाईचात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीच्या सदस्यांची बैठक संपन्न

**दोंडाईचा दि.८(प्रतिनिधी)- येथील आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन, पालिका पदाधिकारी आणि शांतता कमिटीच्या सदस्यांची विशेष आढावा बैठक सोमवारी सायंकाळी दादासाहेब रावल स्टेडियम सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे होते.**

उत्सव काळात (पान ४ वर)

### गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.८- येथील चितोड रोड परिसरात शिवशक्ती कॉलनीतील एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

मनीष बापूराव साळुंखे (वय ४०, रा शिवशक्ती कॉलनी धुळे) असे त्यांचे नाव आहे. सोमवारी ता.७) सकाळी साडेदहा पर्यंतही तो खोलीतून बाहेर पडला नाही. वडील त्याला उठवण्यात गेले. त्यावेळी त्याने घराच्या छताला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत मनीषा साळुंखे आढळला. कुटुंबियांनी आरडाओरड करताच परिसरातील काहींनी धाव घेतली. त्याला श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. (पान ४ वर)

## आदिवासींमधील पहिले स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.भरत वळवींचे नाशिकला निधन



**नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी)- माडा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,आदिवासी समाजातील पहिले स्त्रीरोग तज्ज्ञ तसेच आदिवासी महासंघाचे अध्यक्ष डॉ. भरत वळवी यांचे आज नाशिक येथे दुःखद निधन झाले. मागील काही वर्षांपासून ते आजारी होते. उपचारासाठी ते नाशिक येथे दाखल झाले होते.**

डॉ. भरत वळवी यांनी आरोग्य क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. आदिवासी समाजाच्या आरोग्य, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी त्यांनी सातत्याने काम केले. त्यांच्या निधनामुळे आदिवासी समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी केलेले आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील कार्य समाजासाठी सदैव प्रेरणादायी राहील. त्यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातून शोक व्यक्त केला जात आहे.

## शिरपूर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपचपदाची आरक्षण सोडत जाहीर

**शिरपूर दि.८ (का.प्र.)- तालुक्यातील पेसा क्षेत्राबाहेरील ६८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी सन २०२५-३० या कालावधीकरिता आरक्षण सोडत आठ सप्टेंबरला तहसील कार्यालयात काढण्यात आली.**

यावेळी तहसीलदार महेंद्र माळी, नायब तहसीलदार श्रीमती पंकज मगर उपस्थित होते. कार्तिक कोळी या बालकाच्या हस्ते सोडत काढण्यात आली. नऊ सप्टेंबरला महिला आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच सर्वसाधारण प्रवर्गासाठी ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून एकूण ६८ ग्रामपंचायतींपैकी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ४, अनुसूचित जमातीसाठी १४, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी १६, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ३४ ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या.

अनुसूचित जाती प्रवर्ग : भोरटेक, रुदावली, अंतुर्ली व अर्थे बु. ,अनुसूचित जमाती प्रवर्ग : थाळनेर, टेकवाडे, अर्थे खु., होळ, वाघाडी, बभळाज, भावेर, भटाणे, विखरण बु., अजनाड, गिधाडे, जापोरा, (पान ४ वर)

### कॉ. किशोर ढमाले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा



धुळे, दि. ८ : एकच नारा, सात बारा, अशी घोषणा घेऊन धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींसाठी संघर्ष करणाऱ्या सत्य शोधक कम्युनिस्ट पक्ष आणि सत्यशोधक शेतकरी सभेचे राज्य संघटक किशोर ढमाले यांना आज वाढ दिवसानिमित्त अनेकांनी शुभेच्छा दिल्या. धुळे जिल्ह्यात बहुराष्ट्रीय पवन ऊर्जा कंपन्यांच्या नफ्यासाठी आदिवासींना बेदखल करण्याच्या कार्यक्रमास ढमाले यांनी सक्त विरोध केला. त्यासाठी त्यांना धुळे, नंदुरबारसह पाच जिल्ह्यांतून (पान ४ वर)

## नवरात्रीसह रथोत्सवाच्या नियोजनासाठी भूपेशभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**शिरपूर, दि.८- श्री बालाजी संस्थान, खालचे गाव, शिरपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या नवरात्री उत्सव व रथोत्सव २०२६ च्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थानचे अध्यक्ष भूपेशभाई रसिकलाल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक शनिवार, दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता राजगोपाल भंडारी हॉल, आर. सी. पटेल शैक्षणिक संकुल, मेन बिल्डिंग, शिरपूर येथे होणार आहे.**



आगामी नवरात्री उत्सव व रथोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी या बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. उत्सवातील धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम, रथोत्सवाचे नियोजन, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व पार्किंग व्यवस्था, स्वयंसेवकांची भूमिका तसेच विविध कार्यक्रमांची रूपरेषा याबाबत विचारविनिमय करण्यात येणार आहे. (पान ४ वर)

**धुळे, दि.८- प्रभाग क्र.८ मधील सत्यसाई बाबा सोसायटी येथे कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आ.अनुप अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. या रस्त्याच्या कामासाठी पन्नास लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, नगरसेवक योगेश ईशी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून हे काम मंजूर झाले आहे.**

योगेश ईशी हे गेल्या दहा वर्षांपासून परिचित असून, ते पूर्वी विरोधात निवडून आले असतानाही विकासकामांच्या ठरावांना त्यांनी पाठिंबा दिला. पराभवानंतरही त्यांनी प्रभागातील विकासकामांसाठी पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. त्यामुळे ते विद्यमान नगरसेवकाप्रमाणेच नागरिकांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करत असल्याचे अग्रवाल



## आ.अनुप अग्रवालांच्या हस्ते रस्ता कामाचा शुभारंभ; योगेश ईशींच्या पाठपुराव्याला यश

यांनी यावेळी सांगितले.

सत्यसाई बाबा सोसायटीतील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि मजबूत रस्ता उपलब्ध व्हावा, यासाठी या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होऊन वाहतुकीस मोठी सुविधा होणार आहे. यावेळी स्थायी समिती सभापती लता पोतदार, नगरसेवक निलेश नेमाने, (पान ४ वर)

### सत्ताधाऱ्यांच्या दोन गटात हाणामारी

धुळे, दि.८- शहरातील आग्रारोड परिसरात सोमवारी रात्री दोन गटात पूर्व वैमनस्यातून वाद होऊन हाणामारी झाली. त्यात धारधार शस्त्राने वार केल्याने माजी उपमहापौराचा मुलगा जखमी झाला आहे.

येथील आग्रारोडवरील मनोहर चित्रपट गृहाजवळ सोमवारी रात्री दहाच्या सुमारास दोन गटात वाद होऊन मारहाण झाली. दुसऱ्या गटातील एकाने तीक्ष्ण हत्याराने वार केल्याने माजी उपमहापौरांच्या मुलाला दुखापत झाली. त्याला शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. तर दुसऱ्या गटातील एकालाही दुखापत झाल्याने रुग्णाला दाखल केल्याची माहिती पुढे आली. मारहाणीची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली. परंतु आज रात्री उशिरापर्यंत पोलिसात कुठलाही गुन्हा दाखल झालेला नव्हता. दरम्यान, दोन्ही गट भाजप या पक्षातीलच असून दोन गटातील आपसातील वादातून ही घटना घडल्याची चर्चा आहे.

या घटनेमुळे पक्षांतर्गत कलह उफाळून आल्याचे निदर्शनास आल्याचे जाणकारांकडून बोलले जाते आहे.

## सावऱ्यादिगरजवळील वळणार ड्रायव्हरचा ताबा सुटला; एकवीस जखमी

**नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- धडगावहून सावऱ्यादिगर-बुरखेडा पाड्याकडे जाणारे चारचाकी वाहन तीव्र वळणाच्या उतारावर पलटी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण अपघातात वाहनातील तब्बल एकवीस प्रवासी जखमी झाले आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार, सावऱ्यादिगर गावाजवळ तीव्र वळणाचा उतार असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर चारचाकी वाहन रस्त्यावरच पलटी झाले. अपघाताची तीव्रता एवढी होती की, वाहनातील प्रवासी गंभीर जखमी झाले. या अपघातात एका प्रवाशाचा पाय तुटला असून तीन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. जखमींपैकी प्रवाशांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून वाहन सोडून फरार झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. (पान ४ वर)



## उत्सावाच्या काळात लोडशेडिंग करू नका नगरसेवकांचे वीज अभियंत्याला साकडे

**नवापूर, दि.८ प्रतिनिधी : आगामी गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवापूर शहरातील वीजपुरवठा अखंडित व सुरळीत ठेवावा, तसेच उत्सव काळात वीज कपात व वारंवार लोडशेडिंग करू नये, अशी मागणी नवापूर लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांच्यासह सर्व नगरसेवकांनी वीज कार्यालयात जाऊन वीज अभियंता एम.आर. शेख यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले.**

निवेदनात म्हटले आहे की, गणेशोत्सव व नवरात्रोत्सव काळात शहरात भाविकांची मोठी गर्दी होत असते. विविध सार्वजनिक मंडळांकडून मंडप उभारणी, विद्युत रोषणाई व ध्वनिक्षेपकांची व्यवस्था केली जाते. अशावेळी वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्यास अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असून महिला, लहान मुले तसेच भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे उत्सव काळात शहरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवावा.

तसेच वीज विभागाकडून कोणतीही नियोजित देखभाल अथवा दुरुस्तीची कामे असल्यास ती उत्सवापूर्वीच पूर्ण करावीत आणि गणेशोत्सव (पान ४ वर)

## लाचखोर तलाठी दिनेश दाभाडेसह पंटरला ए.सी.बी.ने केले गजाआड

**धुळे, दि.८- गौण खनिज वाहतूकीला संमती देण्यासह गुन्हा दाखल न करण्याच्या मोबदल्यात बारा हजारांची लाच घेताना तलाठी व खासगी पंटरला एसीबी पथकाने अटक केली.**

येथील तहसील कार्यालयात आज दुपारी कारवाई करण्यात आली. मोहाडी, ता.धुळे येथील तलाठी दिनेश दिलवर दाभाडे (वय ४०), खाजगी पंटर जयेश कैलास चौधरी (३१) यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या धुळे येथील पथकाने अटक केली.

तक्रारदाराचा बांधकाम साहित्य वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांच्या मालकीचे मोठे डंपर आहेत. डंपरसह चालक शहरातील साक्री रोड मोती नाक्याजवळ थांबले. असताना तलाठी दाभाडे याच्यासह काही जणांनी वाहन चालकाकडून मोबाईल क्रमांक घेतला. धुळ्यातील चाळीसगाव चौफुलीवर भेटण्यास बोलावले. तक्रारदाराने दाभाडे व गायकवाड यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल न करण्यासह वाहतूक सुरळीत चालू देण्यासाठी २० हजारांची (पान ४ वर)

## कंत्राटदाराच्या घरासमोर उभ्या असलेल्या नव्या कचरा संकलनाच्या घंटागाड्यांचे गौडबंगाल काय?-शिवसेना

**धुळे, दि.८- धुळे शहरातील कचरा संकलन व्यवस्था सध्या अत्यंत चिंताजनकढघ बनली आहे. उपलब्ध माहितीनुसार महापालिकेच्या ७९ घंटागाड्यांपैकी ३० घंटागाड्या नादुरुस्त असून अनेक भागांत नियमित कचरा संकलन होत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. काही भागांत ४ ते ५ दिवस घंटागाडी येत नसल्याने नागरिकांसमोर कचरा साठवून ठेवण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. असे असतांना कचरा ठेकेदाराच्या घरासमोर नवीन कोऱ्या तीन घंटा गाड्या गेल्या अनेक दिवसापासून उभे असल्याचे दिसून आले आहे. नव्या घंटागाड्याचं गौडबंगाल काय ? असा परखड सवाल**



**शिवसेने मनपा प्रशासनाला केला आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, धुळे महानगरपालिकेने नुकताच महासभेत नवीन घंटागाड्या घेण्याचा ठराव पारित केला. शिवसेना पक्षाने जुन्या ठेकेदाराकडून सर्व गाड्या हस्तांतरित करताना त्या चांगल्या कंडिशन मध्ये आहेत का नाही याची खातरजमा करण्याचे आवाहन तात्कालीन आयुक्तांना केले होते. पण महानगरपालिकेच्या मालकीच्या घंटागाडींची देखभाल ठेकेदाराने करणे गरजेचे असताना त्या कडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्याचा आर्थिक भार महानगरपालिका प्रशासनावरती पडतो.

कचरा संकलनातील हलगर्जीपणामुळे शहराच्या स्वच्छतेबरोबरच आरोग्य, पर्यावरण आणि शहराच्या एकूण प्रतिमेवरही परिणाम होत आहे.बंद असलेल्या तीस घंटागाड्या कधी दुरुस्त होणार? प्रभागाचे निश्चित कचरा संकलन वेळापत्रक कधी जाहीर करणार? बायोमेट्रिक हजेरी व वजन पावती तपासण्याची जबाबदारी कोणाची?करारातील अटींचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या कचरा ठेकेदाराला अद्याप पर्यंत महानगरपालिकेने किती दंड आकारला?ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्याची जबाबदारी कोणाची? असे प्रश्न उपस्थित करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महानगरपालिका आयुक्तांना जाब विचारला असून नागरिकांना दंड आकारण्यापूर्वी नागरिकांना सुविधा देणे हे महानगरपालिकेचे काम आहे. (पान ४ वर)

## शेवाळी-दातर्ती मार्गावर स्कूलबसला धडक विद्यार्थी जखमी; ग्रामीण रुग्णालयात उपचार

**साक्री, दि.८- शेवाळी-दातर्ती मार्गावर काल (दि.८ सप्टेंबर रोजी) सायंकाळी पाचच्या सुमारास शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या टाटा मॅजिक स्कूलबसला समोरून येणाऱ्या इको व्हॅनने धडक दिल्याने अपघात झाला. या घटनेत सुमारे ७ ते ८ विद्यार्थी जखमी झाले. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले.**

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच २०/बीई-२७१५ क्रमांकाची टाटा मॅजिक स्कूलबस शेवाळीकडून दातर्तीच्या दिशेने विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. डिके हॉटेलपासून सुमारे २००



मीटर अंतरावर समोरून येणाऱ्या एमएच१९/एजी-०१६५ क्रमांकाच्या मारुती इको व्हॅनशी तिची धडक झाली. समोरासमोर आलेल्या वाहनांना हुलकावणी देण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. स्कूलबसमध्ये सुमारे १५ ते २० विद्यार्थी प्रवास करीत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अपघातानंतर काही विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली. काही विद्यार्थ्यांना पालकांनी प्राथमिक उपचारानंतर घरी नेले, तर जखमी विद्यार्थ्यांवर साक्री ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यापैकी काहींना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातस्थळी उपस्थित असलेले म्हसदी येथील (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,40,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## प्रशासनाच्या मनमानीला न्यायालयाचा चाप

देशात आणि महाराष्ट्रात आणीबाणी पेक्षाही कठीण परिस्थिती डोळ्यांना दिसते आहे. लोकानुनयाच्या तसेच स्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या लाडाच्या हव्यासामुळे कोणी कसेही वागले तरी त्यांची पाठराखण केली जाते अशी अवस्था सध्या आहे. म्हणूनच ज्या डीजेमुळे लोकांचे कान फाटतात, हृदयाघात होतो, आवाजाच्या दणदणामुळे मुलांना कायमचे बहिरेपण येते म्हणून त्या विरुद्ध पुण्याच्या विद्यानंद बापट यांनी आवाज उठविला. म्हणून धर्मांध आणि निर्बुद्ध तथाकथित भक्ताने बापट यांना मारहाण केली. दुसरे एक जागरूक नागरिक यांनी आमदाराच्या वाहनाचा विशिष्ट क्रमांक असल्यामुळे जी तक्रार केली आणि वाहनाचे चित्रण सोशल मीडियावर प्रसारित केले म्हणून त्यांनाच पोलिसांनी जेरबंद केले. दिल्लीत सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्याने वास्तववादी परिस्थिती विशद केली म्हणून त्यांना रस्त्यातून उचलून पोलीस घेऊन गेले. दिवसभर त्यांचा पत्ता नसल्यामुळे घरचे लोक काळजीत पडले परंतु या अधिकाऱ्याला घरी देखील संपर्क साधता आला नाही. त्याचा गुन्हा काय तर त्याने सत्य परिस्थिती विषयी कथन केले. श्रीमती सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र जगातील सुप्रसिद्ध प्रकाशकांनी प्रकाशित करण्यास नकार दिला. वास्तविक पेंग्विनने तसा करार केलेला होता परंतु या पुस्तकात जे काही संभाव्य असेल त्यामुळे घाबरून पेंग्विन वर दबाव आणून पुस्तक प्रकाशनाबाबत असमर्थता व्यक्तवून घेतली. याच पद्धतीने दिल्ली स्थित नोएडा प्रशासनाने दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थिनी आकृती चौधरी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांन्वये कारवाई करून त्यांना तुरुंगात डांबले होते. या संदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाने जो निकाल दिला तो प्रशासनाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा ठरावा.

एप्रिल २०२६ मध्ये नोएडा येथे कामगारांचे एक आंदोलन झालेले होते. या आंदोलनात आकृती चौधरी यांनी सहभाग घेतला. त्यांच्यावर हिंसाचार आणि जाळपोळ केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. नोएडा प्रशासनाने राष्ट्रीय सुरक्षा कायदा लादल्यामुळे आकृती चौधरी गेल्या पाच महिन्यांपासून तुरुंगात होत्या. नोएडा हे दिल्लीच्या भिंतीशी भिंत असलेले महानगर आहे तरी उत्तर प्रदेश राज्याचा भाग असल्यामुळे आकृती चौधरींचा खटला अलाहाबाद उच्च न्यायालया समोर आला. या खटल्याच्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने नोएडा प्रशासनाची कारवाई आणि तपास यंत्रणांची कारवाई मनमानीची असल्याचे नमूद केले. प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा अधिकार हा अपवादात्मक परिस्थितीत वापरला जातो. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी त्याचा वापर होतो. सामान्यपणे जी आंदोलने चालू असतात. किंवा कामगारांची मागण्या संदर्भातील आंदोलने असतात त्यांचा आवाज दडपण्यासाठी या कायद्याचा वापर करणे योग्य नाही. घटनेतील तरतुदीनुसार न्यायालयाने या संदर्भातील परखड मत व्यक्त केलेले आहे. नोएडाच्या जिल्हाधिकारी आणि स्थानिक पोलीस प्रशासन यांनी रचलेली आकृती चौधरी यांच्या संदर्भातील कथा ही काल्पनिक आणि बनावट असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ही बाब स्पष्ट करतानाच न्यायालयाने आकृती चौधरी यांना पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत. विशेष म्हणजे या रकमेची भरपाई सरकारी तिजोरीतून म्हणजेच जनतेच्या पैशांमधून करावयाची नाही तर बनावट गुन्हा दाखल करण्याच्या कारवाईत सामील असलेल्या अधिकाऱ्यांच्या खिशातून ती करावयाची आहे. त्यांच्या वेतनातून ही रक्कम कपात केली जाणार आहे. न्यायालयाने तसेच आदेश दिले आहेत. कदाचित अशा प्रकारचा निर्णय देशात यापूर्वी न्यायालयाने दिला असेल असे वाटत नाही.

नुकसान भरपाई दिली जाते परंतु नेहमी ती सरकारी तिजोरीतून अदा केली जाते. कुठल्या अधिकाऱ्याने स्वतःच्या खिशातून ती द्यावी असे कधी घडत नाही. मात्र आकृती चौधरी यांच्या खटल्यात तसे घडले आहे. नोकरशहा नेहमीच सत्तेत असलेल्यांच्या अधिपत्याखाली वावरतात. त्यांना जरी घटनेने स्वातंत्र्य दिलेले असले तरी त्या अधिकारांचा वापर न करता ताठ पणे ते काम करीत नाहीत. नोकरी वाचवण्यासाठी सत्ताधारी जे काही सांगतील त्याप्रमाणे ते वागत असतात. आकृती चौधरी कामगार चळवळीत काम करणाऱ्या विद्यार्थीनी असून त्यांचा उपद्रव होऊ नये म्हणून प्रशासनाला विशिष्ट जबाबदार नेत्यांनी कारवाईचे आदेश दिले असावेत. त्यामुळेच सार्वजनिक हिताच्या नावाखाली नोकरशाहीने मर्जी राखण्यासाठी अधिकारांचा गैरवापर करून या प्रकरणात कारवाई केली. ती त्यांच्याच अंगलट आली. हा धडा इतर ठिकाणी देखील अशा पद्धतीच्या घटना घडतात तेव्हा चळवळीतील कार्यकर्त्यांना दिलासा देणारा ठरतो. अधिकाऱ्यांनी किंवा प्रशासनातील इतर घटकांनी आपल्या विरुद्ध सुद्धा अशा पद्धतीची वेळ येऊ शकते हे ध्यानी घेतले पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अशी अनेक प्रकरणे घडली आहेत की ज्यात पोलीस किंवा प्रशासकीय अधिकारी सत्तेत असलेल्यांचे आदेश पाळतात. चुकीचा तपास करतात किंवा चुकीचे गुन्हे दाखल करतात. बेकायदेशीरपणे अटक करून महिनोगणती चळवळीतील कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबून ठेवतात. भीमा कोरेगाव प्रकरणाचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. त्या प्रकरणात दीर्घकाळ अटक करून ठेवलेल्या कार्यकर्त्यांना हायकोर्टानेच दिलासा दिला. आकृती चौधरी यांच्या प्रकरणात देखील हायकोर्टानेच सत्याची बूज राखली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे न्यायालयाने अधिकाऱ्यांना व्यक्तिगत पातळीवर या प्रकरणात जबाबदार धरले आणि स्वतःच्या पगारातून भरपाई देण्याचे आदेश दिले. हा तर कठोर निर्णय आहे.

चौधरींवर राष्ट्रीय सुरक्षा कायदा खाली कारवाई करणाऱ्या जिल्हाधिकारी ह्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कन्या आहेत. कामगार चळवळीत सहभागी असलेल्या विद्यार्थिनीला या खटल्यातून न्याय मिळाला त्याचबरोबर सरकारी यंत्रणेला देखील मोठा धडा मिळाला आहे. भविष्यात यातून प्रशासन काय शिकते ते बघावे लागेल. पुढे पाठ मागे सरसपाट अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. उत्तर प्रदेश राज्य सरकार सतत चर्चेत असते. असंख्य निर्णय बहुदा एकतर्फी असतात. पूर्वसूचना न देता बुलडोझर कुणाच्या घरावरून त्याला आरोपी ठरवून किंवा गुन्हेगार ठरवून फिरवला जातो. त्यामुळे या सरकारला बुलडोझर राज असेही म्हणतात. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात त्या सरकारच्या नाकात वेसण घातलेली आहे. काशी येथील राजघाटावर सर्व सेवा संघाची १३ एकर जमीन आहे. ती जमीन आचार्य विनोबांनी रेल्वे कडून खरेदी केली. रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी खरेदी खतावर स्वाक्षरी केली. पैसे रितसर स्टेट बँकेत भरले. तत्कालीन राष्ट्रपतींच्या आदेशाने या जमिनीची विक्री झाली. परंतु उत्तर प्रदेश प्रशासनाने ही जमीन नकली खरेदी केली आहे असा ठपका ठेवून जमिनीवर असलेल्या १५ इमारती बुलडोझरने पाडून टाकल्या. त्यात असलेला प्रकाशन विभाग संपवून टाकला. एक कोटीहून अधिक किमतीची पुस्तके अस्ताव्यस्त पद्धतीने फेकून देण्यात आली. ही कार्यवाही हुकुमशाही पेक्षाही अधिक जबर होती असे सर्व सेवा संघाचे कार्यकर्ते सांगतात. त्याविरुद्ध दीर्घकाळ आंदोलन करूनही आणि काशी ते दिल्लीपर्यंत पदयात्रा करून लोकांपर्यंत यासंबंधीचे गाऱ्हाणे सर्व सेवा संघाने पोचविले मात्र सरकारच्या कानापर्यंत ते गेलेले नाही. या जागेवर गांधींच्या विचारांच्या ऐवजी भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या समर्थनार्थ यंत्रणा उभी राहणार आहे म्हणजेच फाईव्ह स्टार हॉटेल्स निर्माण होणार आहेत. या परिसराचे नाव नमो घाट असल्यामुळे कोण लालबहादूर शास्त्री आणि कोण विनोबा त्यांना कवडी किमतीत उत्तर प्रदेश सरकारने मोजले आहे. इतकी हडेल हप्पी आणीबाणी देखील कोणी बघितलेली नाही.

प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या समोर आहे. तीन वर्षाहून अधिक काळ महाराष्ट्रातील राजकीय खटल्यांच्या संदर्भात याच न्यायालयात सुनावणी चालू आहे. पक्ष फोडून स्थापन झालेले सरकार संपले. नव्या निवडणुका लागल्या आणि नवे सरकार आले तरीही खटला चालूच आहे. आता संबंधित आमदार अपात्र ठरले तरी काही उपयोग नाही. तरी खटल्याच्या निकालाची आस संपलेली नाही. तसेच सर्व सेवा संघाच्या संदर्भात आहे. नमो घाट निर्मितीमुळे दुसऱ्या बाजूचे काहीच ऐकून घ्यावयाचे नाही असेही कदाचित ठरलेले असेल. या दोन्ही प्रकरणात आकृती चौधरी यांना मिळालेल्या दिलासादायक निर्णयाची पुनरावृत्ती व्हावी अशी अपेक्षा आपल्याला करायला हरकत काय आहे? शेवटी न्यायव्यवस्था आहे, न्याय देवता जागृत आहे असे आपण म्हणत असतो. त्यावर आजही लोकांचा विश्वास आहे. जेव्हा दोन गटात किंवा दोन व्यक्तींमध्ये किंवा दोन कुटुंबात भानगडी होतात तेव्हा कुठे न्याय मिळत नसेल तर कोर्टात न्याय मिळवू अशी भाषा सामान्यपणे लोक वापरतात. याचा अर्थच असा आहे की अन्य कोणी त्यांचे म्हणणे ऐकून घेणार नसले तरी न्यायालय ऐकून घेईल यावर त्यांचा भरोसा असतो. म्हणून कितीही उशीर झाला तरी लोक सबुरीने घेतात. राज्यघटनेने दिलेला वैयक्तिक स्वातंत्र्याचा आणि अधिकारांचा जो मुद्दा आहे तो व्यक्ती असो की संस्था असो त्याचे सतत उल्लंघन होते. परंतु न्यायालयाच्या माध्यमातून अशा संस्था आणि व्यक्तींना (पान ४ वर)

# तृतीयपंथी समाजाच्या हक्क व कल्याणासाठी राज्यभर जनजागृती मोहीम राबवा; आवाहन

**मुंबई, दि.८- तृतीयपंथीयांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरणासाठी तसेच त्यांच्याबाबत समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचे आवाहन विभागीय तृतीयपंथी व्यक्ती हक्काचे संरक्षण व कल्याण मंडळ मुंबई यांनी केले आहे. यामध्ये तृतीयपंथी व्यक्तींना उपलब्ध असलेले संवैधानिक व कायदेशीर अधिकार, शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तसेच उपलब्ध सुविधा यांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर या मोहिमेत विशेष भर देण्यात यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

या जनजागृती मोहिमेमध्ये तृतीयपंथी व्यक्तींना प्राप्त होणारे अधिकार, वित्तीय वर्ष २०२६ मधील अर्थसंकल्पीय तरतुदी व त्याअंतर्गत उपलब्ध सुविधा, तसेच महाराष्ट्र शासनाच्या तृतीयपंथीयांच्या विविध धोरणांची व योजनांची माहिती देण्यात यावी. यामध्ये बीज भांडवल योजना (स्वयंरोजगार व उद्योग उभारणीसाठी आर्थिक सहाय्य), विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण व शैक्षणिक सहाय्य, रोजगारातील आरक्षण व समान संधीबाबत शासनाची धोरणे, आरोग्य सेवा, लिंग-पुष्टीकरण आरोग्यसेवा, मानसिक आरोग्य सेवा व आरोग्य विमा सुविधा यांचा समावेश करण्यात यावा. तसेच निवास (गृहनिर्माण) सुविधा, पुनर्वसन योजना, सामाजिक सुरक्षा योजना, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, आर्थिक समावेशन, कायदेशीर मदत, केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना याबाबतची माहितीही व्यापक स्वरूपात प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तृतीयपंथी व्यक्तींविषयी संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी शासकीय अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, आरोग्य कर्मचारी, पोलीस विभाग, खासगी क्षेत्रातील नियोजक तसेच सर्वसामान्य नागरिक यांच्यासाठी संवेदनशीलता निर्माण करणारे कार्यक्रम आयोजित करण्यावरही भर देण्यात आला आहे. तृतीयपंथी व्यक्तींचे संवैधानिक व कायदेशीर अधिकार, समानता, सन्मान आणि भेदभावमुक्त जीवन याबाबत व्यापक जनजागृती करण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे.

**दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे डिजिटल माध्यमांतून जनजागृती**

मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये जनजागृतीपर साहित्य तयार करून दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे, सामाजिक माध्यमे, शासनाचे संकेतस्थळ, डिजिटल माध्यमे, माहितीपट, परिसंवाद, कार्यशाळा तसेच रस्त्यावरची नाटके (स्ट्रीट प्ले) आदी विविध माध्यमांतून राज्यभर प्रसारित करण्याचे आवाहन (विभागीय तृतीयपंथी व्यक्ती हक्काचे संरक्षण व कल्याण मंडळ) यांच्यामार्फत करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे तृतीयपंथी यांच्याविषयी समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास, भेदभाव कमी होण्यास तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होणार आहे.



# बिलबारा उपकेंद्रावरील वीजपुरवठा सुरळीत करा; शेतकऱ्यांचे तहसीलदारांना साकडे

**नवापूर, दि.८ (प्रतिनिधी) - बिलबारा येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रावरील वीजपुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना नियमित व पुरेसा वीजपुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी बिलबारा येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार दत्तात्रय जाधव यांना निवेदन दिले.**

दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी ३३/११ केव्ही उपकेंद्र बिलबारा येथे परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी संबंधित अभियंता तुपे हे देखील उपस्थित होते. शेतकऱ्यांनी वीजपुरवठा वेळेवर होत नसल्याची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. सध्या २४ तासांत केवळ चार तास वीजपुरवठा मिळत असून, तोही वारंवार खंडित होत असल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे.

अपुरा वीजपुरवठा सुरू राहिल्यास शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकरी जीवन-मरणाच्या संकटात सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जिल्ह्यात आसमानी संकटाची परिस्थिती असताना वीजपुरवठाही अपुरा मिळत असल्याने शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत असल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यामुळे ३३/११ केव्ही उपकेंद्र बिलबारा येथील चारही फिटर तातडीने सुरळीत करून शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मागणीची तातडीने दखल न घेतल्यास तहसीलदार कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

निवेदनावर सरपंच यशवंत वसावे, सलिम वसावे, वासु कोकणी, मोहन वसावे, सुलम गावीत, सुधाम वळवी, विश्वास वळवी, प्रशांत नाईक, विकास वळवी, गोविंद गावीत, प्रकुराम गावीत, धारासिंग पाडवी, विरजु वसावे, मनेष पाडवी, निलेश वसावे, गणेश वळवी, प्रविण वळवी, सप्नील वसावे, राजु वळवी, अमृत वळवी यांच्यासह बिलबारा येथील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## काठीत केवायसी शिबिर संपन्न

शहादा, दि.८ (प्रतिनिधी)- दुर्गम भाग म्हटले की मूलभूत सुविधांसोबतच बँकिंग व ऑनलाइन सेवांचा प्रश्नही नागरिकांसमोर उभा राहतो. विविध शासकीय योजनांचा लाभ मंजूर होऊनही केवळ बँक खात्याची केवायसी प्रलंबित असल्याने लाभाच्या रकमेपासून वंचित राहण्याची वेळ अनेक नागरिकांवर येते. ही अडचण लक्षात घेऊन माजी सरपंच जितेंद्र पाडवी यांच्या प्रयत्नातून काठी (ता. अक्कलकुवा) येथे गेल्या पाच दिवसांपासून बँक ऑफ महाराष्ट्र मोलगी शाखेच्या माध्यमातून केवायसी शिबिर घेण्यात येत आहे. गावातच केवायसीची सुविधा उपलब्ध झाल्याने शेकडो नागरिकांना बँकेच्या फेऱ्यांपासून दिलासा मिळाला आहे.

घरकुल, संजय गांधी निराधार योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, शेतकरी तसेच विविध शासकीय आर्थिक योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होतो. मात्र खात्याची केवायसी पूर्ण नसल्यास किंवा काही कारणास्तव ती प्रलंबित राहिल्यास लाभाची रक्कम मिळविताना अडचणी निर्माण होतात. दुर्गम भागातील नागरिकांना केवळ केवायसीसाठी बँकेत जाणे वेळ व पैशांच्या दृष्टीने खर्चिक ठरते. कामधंदा सोडून प्रवास करावा लागतो, बँकेसमोर तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. अनेकदा एकाच कामासाठी पुन्हा-पुन्हा बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने प्रवास खर्चासोबत रोजगाराचेही नुकसान होते.

याच पार्श्वभूमीवर काठी येथे सुरू करण्यात आलेल्या केवायसी शिबिरामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. गावातच बँकिंग सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांचा वेळ व प्रवास खर्च वाचत असून, रोजगार बुडवून बँकेत जाण्याची वेळही टळत आहे. दुर्गम भागातील नागरिकांच्या सोयीसाठी अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे घेण्यात यावीत अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शिबिराच्या आयोजनासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य सी.के. पाडवी, रवींद्र वसावे, अजय पाडवी, जयसिंग वसावे व विजय पाडवी परिश्रम घेत आहेत.

# स्वातंत्र्यानंतर शेलगदागोराडीला विद्युतीकरण राष्ट्रवादीचे डॉ.अभिजीत मोरे हस्ते कामाचा शुभारंभ

**नंदुरबार, दि.८: धडगाव तालुक्यातील कारभारीपाडा ते शेलगदागोराडी या परिसरातील विद्युतीकरणाच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेसचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे आणि जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती रतन पाडवी यांच्या हस्ते करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर प्रथमच या दुर्गम भागात वीज पोहोचणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**

या महत्त्वपूर्ण विद्युतीकरणासाठी रतन पाडवी आणि गोराडी गावाचे माजी सरपंच केवजी पाडवी यांनी डॉ. अभिजीत मोरे यांच्याकडे मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला होता. नंदुरबार जिल्ह्याचे माजी पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जिल्हा नियोजन विभागाच्या माध्यमातून या कामाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून दिला. या प्रयतकांना यश मिळाल्याने प्रत्यक्ष विद्युतीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या कामामुळे शेलगदागोराडी परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची विजेची समस्या दूर होण्यास मदत होणार असून, शिक्षण, पाणीपुरवठा, शेती तसेच दैनंदिन जीवनातही मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तळोदा तालुकाध्यक्ष योगेश चौधरी, जिल्हा सरचिटणीस मधुकर पाटील, गोराडीचे सरपंच केवजी पाडवी, युवक जिल्हाध्यक्ष सिताराम पावरा, शहादा तालुकाध्यक्ष संतोष पराडके, युवक जिल्हा उपाध्यक्ष तथा सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष छोटू कुवर, धडगाव तालुकाध्यक्ष रवी पावरा, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष संजय खंडारे, तळोदा नगरसेवक इमरान खाटीक, पंचायत समिती सदस्य ठाणसिंग पावरा, खडक्या गावचे सरपंच नवलसिंग वळवी, भमाणे गावचे सरपंच खुशाल, माळ गावचे माजी सरपंच लोटन, सावऱ्यादिगरचे सरपंच राड्या, सुरवाणीचे सरपंच रोहिदास पाडवी, अट्ठी गावचे सरपंच शिल्या वसावे, धुवाणीचे सरपंच रतन पाडवी, ग्रामपंचायत सदस्य सचिन वसावे, चिंचखेडीचे कोटा वळवी, दारासिंग भील, धडगाव तालुका महिला आघाडी अध्यक्षा रंजना पाडवी, तालुका उपाध्यक्ष दुर्गा, तसेच धिरज्या खरवड, ईरामा खरवड, छगन पावरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जाहीर नोटीस** नि.६/ड

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८०७/२०२६

१) ठुमलीबाई भायला पावरा, २) नेवजी भायला पावरा,
३) खेलसिंग भायला पावरा,
सर्व रा. नवादेवी पो. कोडीद, ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदा
।। विरुद्ध ।।
कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार ठुमलीबाई भायला पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे भायला गोटू पावरा, हे दि. २९/०८/२०२२ रोजी मौजे नवादेवी पो. कोडीद ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे भायला गोटू पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. ०३/१०/२०२६ रोजी ठिक १०.३०वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

सही... कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) सही... सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर



**जाहीर समन्स/नोटीस**

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांच्या न्यायालय**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.३०५/२०२६, Exh.6,

१) युनुस तहेर पटेल, वगैरे. ....अर्जदार
विरूध्द
कै.ताहेर अब्बास पटेल (मयत), (मृत्यू दि.०७/०१/२०२१)
मृत्यू ठिकाणी : जातोडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे.
कुणीही नाही ....जाबदेणार

मुंबई रेग्युलेशन १८२७ ॲक्ट (भाग VIII) प्रमाणे वारस दाखल मिळण्यासाठी

तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार नं. (१) युनुस तहेर पटेल, वय: ४४ रा. रा. जातोडा, पोस्ट् वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे (२) तनवीर ताहेर पटेल वय ३५, धंदा : मजुरी रा.जातोडा, पोस्ट् वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे (३) शबानाबी अब्दुल रहिमान वय, ४७, धंदा : घरकाम पटेल अब्दुल रेहमान, ९० कानपुरा नियर लिंबायत, पोलिस स्टेशन उधना यार्ड उधना, सूरत सीटी, सूरत गुजरात ३९४२१० (४) रुबिनाबी फिरोज पटेल वय:४३ धंदा: घरकाम इदगाह जवळ, राजे संभाजी शाळे समोर, शिरूड, शिरूड, धुळे (५) निलोफर आरीफ पटेल वय: ३९ धंदा : घरकाम तांबापूर शिर्सोली नाका, जळगाव मेहरून, जळगाव (६) सुमैय्या मुश्ताक पटेल वय : ४२ धंदा : घरकाम मु.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा. जि.धुळे (७) प्रविनबी तहेर पटेल वय: ६९ धंदा : घरकाम मु.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा. जि.धुळे

अर्जदार १ ते ६ चे वडिल व ७ चे पती हे कै.ताहेर अब्बास पटेल हे दि. ०७/०१/२०२१ रोजी मौजे जातोडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे येथे मयत झाले आहेत, त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार नं.१ ते ७ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय कामासाठी तसेच महसुल कामासाठी वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज नं.३०५/२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जाचे कामी कुणाची काही हरकत, तक्रार अगर वारसांबाबत आपला हितसंबंध असल्यास शिंदखेडा न्यायालयात पुढील ता.१७/१०/२०२६ रोजी आपली हरकत अगर म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतः अगर आपल्याकडील वकील लावून हजर रहावे, कुणाचीही तक्रार, हरकत न-आल्यास अर्जाची चौकशीचे काम नियमानुसार चालविणेत येईल.

सदरचे जाहिर नोटीस आमचे सहीनिशी व मे.कोर्टाच्या सही शिक्कानिशी दिला आहे.
आज दि.३/९/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

हुकुमावरून

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायालय, क-सत्र, शिंदखेडा (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क-सत्र, शिंदखेडा



**जाहीर नोटीस** ॲड.पी.सी.परदेशी, शिंदखेडा, मो.८८०५०८१५३३

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो., (ज्यु.डि.) यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं.३०२/२०२६, Exh.6,

(१) अब्दुलहमीद भाईसाब पटेल, वय ५४, धंदाः मजुरी,
रा. जातोडा, पोस्ट् वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे
(२) अफरोज बी अय्युब पटेल, वय ४२, धंदा : घरकाम,
रा. जातोडा, पोस्ट् वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे
(३) बीबाबी अमीर पटेल, वय ६६, धंदा : घरकाम,
सर्वे नं.३५-३६ प्लॉट नं.७ मारूती नगर, गल्ली नं.१,
लिंम्बायत सूरत सिटी, लिंबाथत, सुरत गुजरात. ....अर्जदार
विरूध्द
कुणीही नाही. ....जाबदेणार
कै.जिन्नत भाईसाब पटेल, (मृत्यू ता.०३/०८/२०१४)
मृत्यू ठिकाण- जातोडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे, ....मयत

ज्या अर्थी अर्जदार मयत जिन्नत भाईसाब पटेल यांची आई या नात्याने कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांना मयत जिन्नत भाईसाब पटेल यांचा वारस दाखला शासकीय, निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने, अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणेबाबत मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार यांचे व्यतिरीक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायलयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दिनांक १६/१०/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहुन लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदार यांचे व्यतीरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येऊन मयताचे वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी मागणी केल्या प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायधिश क.स्तर सो शिंदखेडा जि.धुळे यांचे आदेशावरुन सदरची नोटीस प्रसिद्धिस दिली असे.

आज रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिद्धिस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिंदखेडा (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिंदखेडा





## आर.सी. पटेल माध्यमिक विद्या.त आरोग्य तपासणी

शिरपूर, दि.८- तालुक्यातील होळनांथे येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय शिरपूर यांच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये इयत्ता पाचवी ते इयत्ता बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्याची तपासणी करण्यात आली. यात जवळजवळ ५३७ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. सुशील वाघ, डॉ. काजल माळी, डॉ. उमेश भदाणे, प्रतिभा जाधव यांनी केली. सदर आरोग्य तपासणी दरम्यान आवश्यक त्या सूचना विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्फत देण्यात आल्या. एकंदरीत विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्याची तपासणी केली असता आरोग्याच्या बाबतीत विद्यालयातील सर्व विद्यार्थी जागरूक आहेत याबद्दल पथकाने समाधान व्यक्त केले. शिबिराचे आयोजन प्राचार्य एस.डी. गाडीलोहार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी शिक्षक सी. आर. शिंपी, व्ही.एस. मासरे, अश्विनी महाजन, वाय. आर. ठाकरे, तुषार पाटील, एस.के. पावरा, एम.जी. पावरा, राहुल पवार, वृषाली कासार, सागर वारुडे, डी.डी. राजपूत, जागृती जाधव, योगिता चौधरी, प्रतिभा सावळे यांची उपस्थिती होती.

**प्रकाश में आज आप केसाथ**




अनिल कपूर विनोद मेहरा स्मिता पाटील रति अग्निहोत्री


**जाहीर समन्स/नोटीस** ॲड.प्रमोद एस.परदेशी, शिंदखेडा,

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांच्या न्यायालय**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.३०४/२०२६, Exh.6,

१) हरीस अब्दुलरहीम पटेल, (वगैरे) ....अर्जदार
विरूध्द
कुणीही नाही ....जाबदेणार
कै.अब्दुलरहीस अब्बास पटेल (पटेल), (मृत्यू दि.३१/१०/२०२५)
मृत्यू ठिकाणी : जातोडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे.

मुंबई रेग्युलेशन १८२७ ॲक्ट (भाग VIII) प्रमाणे वारस दाखल मिळण्यासाठी

(१) तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार नं. (१) हरीस अब्दुलरहीम पटेल, उ.व.३७ रा.रा.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे (२) अरशद अब्दुलरहीम पटेल वय ३९, धंदा- मजुरी रा.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे (३) पटेल आशिक अब्दुलरहीम वय- ३४, धंदा- मजुरी रा.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे (४) अयनुर अब्दुलरहीम पटेल उ.व ५७ धंदा-मजुरी रा.जातोडा, पोस्ट वारुड, ता.शिंदखेडा, जि.धुळे अर्जदार १ ते ३ चे वडिल व ४ चे पती हे कै.अब्दुलरहीम अब्बास पटेल हे दि.३१/१०/२०२५ रोजी मौजे जातोडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे येथे मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार नं.१ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय कामासाठी तसेच महसूल कामासाठी वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज नं.३०४/२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जाचे काम कोणाची काही हरकत, तक्रार अगर वारसांबाबत आपला हितसंबंध असल्यास शिंदखेडा न्यायालयात पुढील ता.१७/१०/२०२६ रोजी आपली हरकत अगर म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतःअगर आपल्याकडील वकील लावून हजर रहावे, कुणाचीही तक्रार, हरकत न आल्यास अर्जाची चौकशीचे काम नियमानुसार चालविणेत येईल. सदरचे जाहिर नोटीस आमचे सहीनिशी व मे.कोर्टाच्या सहीशिक्यानिशी दिला आहे. आज दि.३/९/२०२६ रोजी प्रसिद्धीस दिली असे.

हुकुमावरून

कामगिरी कारकून, मे.दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा (शिक्का) सहा. अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा



प्रो.जमा **जाहीर समन्स/नोटीस** ॲड.प्रमोद एस.परदेशी, शिंदखेडा,

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांच्या न्यायालय**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. /२०२६, Exh.6,

(१) देविदास मनसाराम माळी, वगैरे ....अर्जदार
विरूध्द
कुणीही नाही ....जाबदेणार
कै.मन्साराम लाला माळी (मयत), (मृत्यू दि.१०/०२/२०२६)
मृत्यू ठिकाणी : वाघोदे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ....मयत

तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.(१) देविदास मनसाराम माळी, रा. त्रिभुवन चाळ, झांजे नगर, खानदेश चाळ जवळ, लोकमान्य नगर, पाडा नं.३, ठाणे पश्चिम, ठाणे. पश्चिम, ठाणे. (२) भास्कर मन्साराम माळी, (३) अरुण मन्साराम माळी, अ.नं.२ व ३ दोघे रा.वाघोदे, पो.अजंदे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. (४) अलका रमेश खलाणे, रा.चिरणे-कदाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. (५) कोमलबाई ज्ञानेधर जाधव, रा.वादळी, ता.जि.नंदुरबार. (६) सुरेखाबाई शांताराम माळी, रा.वाघोदे, पो.अजंदे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. (७) विवेक शांताराम माळी, रा. त्रिभुवन चाळ, झांजे नगर, खानदेश चाळ जवळ, लोकमान्य नगर, पाडा नं.३, ठाणे पश्चिम, ठाणे पश्चिम, ठाणे. (८) चेतना वैभव माळी, रा.हनुमंतखेडे, पो. देवगांव, ता.पारोळा, जि.जळगांव. (९) गणेश बुधा महाले, रा. वाघोदे, पो.अजंदे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. (१०) मनिषा भानुदास माळी, उ.व.४२, धंदा : घरकाम, रा.प्रियदर्शनी नगर, नगांववारी, देवपुर, धुळे, ता.जि.धुळे. (११) आशा सुनिल माळी, रा.३८२, सागर पार्क, गोपाल नगर जवळ, दालीया रोड, कोसामडी, ता.कोसामळी, जि.भरुच (गुजरात) यांनी या न्यायालयात अर्जदार नं.१ ते ५ यांचे वडील व अर्जदार नं.६ चे सासरे व अर्जदार नं.७ ते ११ चे आजोबा मन्साराम लाला माळी हे दि.१०/०२/२०२६ रोजी मौजे वाघोदे, ता.शिंदखेडा, जि.धुळे येथे मयत झाले आहेत, त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार नं.१ ते ११ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय कामासाठी तसेच महसुल कामासाठी वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज नं. /२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जाचे कामी कुणाची काही हरकत, तक्रार अगर वारसांबाबत आपला हितसंबंध असल्यास शिंदखेडा न्यायालयात पुढील ता.१५/१०/२०२६ रोजी आपली हरकत अगर म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतःअगर आपल्याकडील वकिल लावून हजर रहावे, कुणाचीही तक्रार, हरकत न-आल्यास अर्जाचे चौकशीचे काम नियमानुसार चालविणेत येईल.

सदरचे जाहिर नोटीस आमचे सहीनिशी व मे.कोर्टाच्या सही शिक्कानिशी आज दि.३/९/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

हुकुमावरुन

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा




# जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करण्यात यावा राष्ट्रवादी श.प.गटाचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**साक्री, दि.७ (प्रतिनिधी)- धुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करणेबाबत धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी धुळे यांना निवेदन सादर करण्यात आले.**

यंदा पावसाळ्यात सुरुवातीपासूनच पावसाचे प्रमाण अतिशय अत्यल्प आहे, त्यातल्या त्यात धुळे जिल्ह्यात तर खूपच कमी पाऊस झालेला आहे. आता गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली असल्याने पिके करपली आहेत तसेच जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. आता पाऊस आला तरी ५०% देखील पिके हाती येणार नाहीत अशी परिस्थिती आहे इतक्या कमी पर्जन्यमानामुळे खरीप हंगाम तर शेतकरी बांधवांच्या हातून गेलाच आहे परंतु जमिनीतील पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे रब्बी हंगामाची पिके देखील शेतकऱ्यांना घेता येणार नाहीत अशी परिस्थिती संपूर्ण जिल्ह्यात निर्माण झाली आहे, अशा परिस्थितीत संपूर्ण धुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी त्याचबरोबर विविध योजनांसाठी ज्या जाचक अटी लावल्या जातात त्या शिथिल कराव्यात आणि वेगवेगळ्या अनुदानाच्या माध्यमातून शेतकरी बांधव जगवावा तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात किंवा शेतकरी बांधवांना जनावरांच्या चाऱ्यासाठी चारा अनुदान उपलब्ध करून द्यावे. व शासनास लवकरात लवकर कळवून दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षा गायत्री पाटील, धुळे शहराध्यक्ष नंदू येलमामे, साक्री तालुकाध्यक्ष गिरीश नेरकर, किसान सभा प्रदेश उपाध्यक्ष सयाजी, ठाकरे, शिंदखेडा डॉ. शांताराम पाटील, शिरपूर तालुकाध्यक्ष व्यंकटेश पाटील, पदविधर आघाडीचे दिलीप पवार, शेतकरी संघाचे संचालक आणि कासारेचे सरपंच उल्केश देसले, दिनेश (बाळा) खैरनार, रविंद्र तोरवणे, संदीप भामरे, गणेश तोरवणे, श्रीमती खैरनार आदी उपस्थित होते.

# प्रशासनाच्या मनमानीला न्यायालयाचा चाप

(पान २ वरून) संरक्षण मिळते तद्वतच संविधानाची देखील बूज राखली जाते. लोकशाहीच्या रक्षणार्थ कायदेमंडळ, अंमलबजावणी मंडळ अर्थात नोकरशाही, न्यायव्यवस्था आणि मीडिया असे चार खांब स्वायत्त आहेत. त्यापैकी दुसरा खांब हा नेहमी डळमळीत असतो. परंतु न्यायालय मात्र बऱ्याच अंशी संविधानाला बांधील राहून करोडो जनतेच्या आशा आकांक्षा पल्लवीत करण्याचा प्रयत्न करते ही बाब दिलासा देणारी म्हणावी लागेल.

## प्रियदर्शिनी सहकारी सुतगिरणी मर्या, शिरपूर जि.धुळे

वार्षिक सर्वसाधारण सभा २०२५-२६
सभेची नोटीस
(फक्त सभासदांसाठी)

जा.क.प्रशासन/२२१/२०२६-२७ — दि.७/९/२०२६

श्री.रा.रा. ------------------------------------------------

यांना कळविण्यात येते की, आपल्या प्रियदर्शिनी सहकारी सुतगिरणी मर्या, शिरपूर जि.धुळे ची सन २०२५-२६ ची वार्षिक सर्व साधारण सभा दि.२२/९/२०२६ वार मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता सुतगिरणी कार्यस्थळ, शिरपूर-चोपडा रोड येथे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.भुपेशभाई रसीकलाल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थापक मा.आ. श्री.अमरीशभाई पटेल यांच्या उपस्थीतीत खालील विषयांवर विचार करणेसाठी आयोजीत करण्यात आली आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित राहावे हि विनंती .

**-: सभेपुढे येणारे विषय :-**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचुन मंजुर व कायम करणे.
२) मा.संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२५-२६ चा संस्थेच्या कामकाजाच्या अहवालाची माहीती घेवुन नोंद घेणे.
३) मा.वैधानिक लेखापरीक्षक यांनी सन २०२५-२६ चे लेखापरीक्षण केलेले संस्थेचे आर्थिक पत्रके व या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.
४) संस्थेच्या सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या अहवालावर तयार केलेल्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे व त्यास मंजुरी देणे.
५) सन २०२६-२७ च्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांच्या शासनमान्य नामतालीकेतुन वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरवीणे.
६) सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रका पेक्षा कमी/जास्त झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजुरी देवून सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेवून मंजुरी देणे.
७) मा.अध्यक्ष साो. यांच्या पुर्वपरवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
**(भुपेशभाई पटेल)**
अध्यक्ष

सूचना-१) गणपुर्तीच्या अभावाने सभा तहकुब झाल्यास सदर सभा अर्ध्यातासानंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी पुन्हा घेण्यात येईल, अशा घेण्यात येणाऱ्या सभेला गणपूर्ती ची आवश्यकता असणार नाही.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, सहकारी, पतसंस्था इत्यादींस जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे देवपूर येथील महानगरपालिका हद्दीतील नगर भूमापन क्र. ७२८० क्षेत्र ८५७.७० चौ. मी. सत्ता प्रकार क बालाजी टॉवर अपारमेंट मधील तळमजलावरील शॉप क्र. १४ चे क्षेत्र १३.७५ चौ. मी. ही मिळकत धर्मेंद्र मधुकर संदानशिव यांच्या मालकी व कब्जे उपभोगातील २ दुकाने यांची चतु:सिमा पुर्वेस : सदर शॉपिंग सेंटर स्वामीनारायण रोड लगतचे प्रवेशद्वार, पश्चिमेस गाळा क्र. १४, दक्षिणेस स्वामी नारायण मंदिर रोड, उत्तरेस सदर गुरुदत्त शॉपिंग सेंटर उर्वरित भाग, या प्रमाणे चतु:सिमा असलेली २ दुकाने विकत घेण्याकामी आमच्या पक्षकार श्री. अनिल दत्तात्रय बागड रा. नाशिक यांनी धर्मेंद्र मधुकर संदानशिव यांच्या सोबत वर नमूद मिळकतीचा सौदा झाला असून बयाना दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचेही लोन, गहाणखत, पार्टीप्रकारे फर्म,बोजा, सौदा पावती, तसेच कोर्टातील न्यायनिवाडे अथवा कुठल्याही प्रकारे तबदिलीचा व्यवहार झाला असेलतर, सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्धझाल्यापासून ७ दिवसांच्या आत सर्व कागदपत्रानिशी लेखी हरकत घ्यावी. दिलेल्या मुदतीतनंतर आमचे पक्षकार श्री. अनिल दत्तात्रय बागड वर नमूद मिळकत खरेदी करुन घेतील.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. दि. ८/९/२०२६

**अॅड.पी. एस. महाजन** मो.९८२३२१५४४०
कार्यालय : गाळा क्र. ९ बागुल संकुल दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे


S.S.V.P.S's B. S. DEORE
COLLEGE OF ENGINEERING, DHULE (M.S.)
Email- princi.ssvps@gmail.com DTE Code : 5103
ADMISSION NOTICE 2026-27
Institute Level Quota and CAP Vacancies
Applications are invited from eligible candidate for admission to
First Year B. Tech., Direct Second Year (DSE) & First Year M.B.A.
Admission will be as per inter-se-merit derived from merit list declared by competent authority. Detailed information and admission process will be displayed on Institute notice board from time to time. All matter related to admissions will be handled by "Institute admission Committee" only. The application form can be obtained from the college office. For schedule of admission & other details please visit college website www.ssvpsengg.ac.in
In-charge Admission Committee Contact – 9175530000
PRINCIPAL CHAIRMAN


## NAME CHANGE

MY OLD NAME WAS **YASMEEN BEGUM SHAUKATMIYA JAHAGIRDAR** MY NEW NAME IS **YASMEEN SHAUKATMIYA JAHAGIRDAR**
ADD- MAIN ROAD NER, GANDHI CHOUK, MAHAL PANDHARI, DHULE-424303(M.S.).

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS **MUHAMMAD SABIR MOHAMMAD SADIQUE ANSARI** AND MY NEW NAME IS **MOHAMMAD SABIR MOHAMMAD SADIQUE ANSARI**
ADD- PLOT NO.8A, VADJAI ROAD, MILLAT NAGAR, DHULE-424001.

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS **HABIB KHAN HAMID KHAN** AND MY NEW NAME IS **HABIB KHAN HAMID KHAN MANIYAR**
ADD- TAJ TELECOM 80 FEET ROAD OPP AL MASIRAH HOSPITAL, SABIR NAGAR, DHULE, DIST.DHULE-424001.


जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचालित
**झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय,धुळे**
DTE CODE 05554
NAAC Accredited B++
Approved by AICTE, DTE, Affiliated to KBCNMU, Jalgaon
Z. B. Patil Marg, Wadibhokar Road, Deopur, Dhule-424002
Visit us at : www.zbpatil.in

**प्रवेश प्रक्रिया सुचना**

**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता बी-सी-ए./बी-बी-ए. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाकरीता संस्थास्तरावरील फेरी**
(Against CAP )

केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) फेऱ्यांनंतर संस्थेमध्ये रिक्त जागांकरिता प्रवेशाची फेरी संस्थेमध्ये घेण्यात येणार आहे. तरी सदर प्रवेश फेरीकरिता महाराष्ट्र राज्य सीईटी सेलच्या केंद्रीयभूत प्रवेशाकरिता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह खालील तक्त्यात नमूद दिनांकास प्रवेशाकरिता संस्थेमध्ये प्रत्यक्ष हजर राहावे. स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास १०:३० ते दु. ५:०० या वेळेत प्रवेशाचा अर्ज पूर्ण भरून जमा करणे बंधनकारक राहील.

| प्रक्रिया | दिनांक / वेळ |
|---|---|
| BCA साठी अर्ज करण्याचा कालावधी | 11/09/2026 ते 12/09/2026, सायंकाळी 5 वाजेपर्यंत |
| BBA साठी अर्ज करण्याचा कालावधी | 09/09/2026 ते 12/09/2026, सायंकाळी 5 वाजेपर्यंत |
| तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) प्रसिद्ध | 12/09/2026 रोजी सायंकाळी 6 वाजता |
| अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) प्रसिद्ध | 13/09/2026 रोजी सकाळी 10 वाजता |
| प्रवेश निश्चिती (Admission Confirmation) | 13/09/2026 ते 14/09/2026, दुपारी 2 वाजेपर्यंत |

अधिक माहितीसाठी कॉलेज नोटीस बोर्ड व संस्थेच्या वेबपेजला वेळोवेळी भेट द्यावी.

प्रा. पंकज जी. अडावदकर, विभाग प्रमुख, मो.नं. ९८५०३७७०७६ — डॉ. ए .ए . पाटील, प्र.प्राचार्य


## जाहीर नोटीस

### धुळेयेथील मे. अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी साो. यांचे न्यायालयात

दि. ०७/०९/२०२६
जन्म-मृत्यू /रजि नं.६०/२०२६

अर्जदार
**विशाल राजेश परदेशी**, उ. वय ३० वर्ष,
रा. नटराज टॉकीज, महाराणा प्रताप नगर, ता. जि. धुळे मो.नं. ९२२६९६९४०१... अर्जदार

॥ विरुद्ध॥

**धुळे महानगरपालिका धुळे** ...जाबदेणार
(नोटीस निबंधक जन्म मृत्यू नोंद विभाग,महानगरपालिका,धुळे यांचेवर करण्यात यावी.)

ज्याअर्थी वरील अर्जदार **विशाल राजेश परदेशी यांची मुलगी नामे कुमारी करिना विशाल परदेशी** यांचा जन्म दि. १२/०९/२०२३ रोजी राहत्या घरी धुळे ता. जि. धुळे येथे झालेला असून त्यांची धुळे महानगरपालिका धुळे येथील दप्तरी नोंद नसल्याने व राहून गेल्याने जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ अन्वये आज रोजी अपर तहसिलदार धुळे शहर यांचे न्यायालयात जन्माची नोंद मा. निबंधक साो. जन्म मृत्यू नोंदणी विभाग, धुळे महानगरपालिका धुळे यांचे दप्तरी लावणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार यांची मुलगी याचा जन्म दि. १२/०९/२०२३ ही जन्म/मृत्यू तारीख असुन शाळा प्रवेश कामी जन्म दाखल्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी खालील प्रमाणे पुरावे जोडलेले आहेत.

१) आधारकार्ड, रेशन कार्ड, २) वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला.
३) आईचा शाळा सोडल्याचा दाखला ४) विजपावती, करपावती,
५) लसीकरणाचा पुरावा, रुग्णालय नोंदी.

त्याअर्थी वरीलप्रमाणे नोंद करणेस कोणाचीही काही एक तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे चौकशीचे कामी उपरोक्त न्यायालयात दि. २२/०९/२०२६ पावेतो स्वत: अगर वकिलामार्फत धुळे येथील मे. अपर तहसिलदार साो. धुळे शहर यांचे समक्ष हजर राहावे व आपले म्हणने, तक्रार व लेखी हरकत सादर करावी. अन्यथा कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर कामी चौकशी होवून अर्जदाराचे नावाने जन्म/मृत्यू नोंद करुन घेण्याकामी योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज रोजी प्रसिद्धीस दिली असे..

आदेशावरुन
सही...
शिक्का
**(वैशाली हिंगे)**
अपर तहसिलदार धुळे शहर

## जाहीर नोटीस

या द्वारे तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था, सावकार व इतर यांना कळविण्यात येते की,

तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे येथील मौजे धुळे सर्व्हे नं. ४१२/१क/१ड पैकी प्लॉट नं. ५२ त्यासी क्षेत्र ५७ चौ. मी. ही मिळकत.

पुर्व : प्लॉट नं. ५३, पश्चिम :प्लॉट नं. ५१,
दक्षिण: स.नं.४१२/२ उत्तर : रस्ता

येणे प्रमाणे वर्णनांचे आतील मिळकती माझे म्हणजेच मोहम्मद जावीद मेहबुब अली अन्सारी मालकी हक्काची ताबे उपभोगातील आहे.सदर मिळकतीचे पुर्वीचे मालक १) ताहीर अली मोहम्मद सईद व मुकीम सुंदर कुरेश यांचेत झालेला मुळ/अस्सल खरेदीखत दस्त क्र. १२२१/२०२२ दि. १५/०३/२०२२ रोजीचा खरेदीखत अस्सल पावतीसह गहाळ झाले,हरविले आहे.

तरी सदर मोहम्मद जावीद मेहबुब अली अन्सारी हे इक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लि. धुळे यांचेकडून कर्ज घेत असुन, सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कुठल्याही प्रकारची हरकत किंवा सदर मिळकती ही कोणत्याही वित्तीय संस्था अगर सावकार तसेच कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा,सौदा इ. असल्यास ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकती सोबत योग्य तो कागदोपत्री पुरावासादर करुन शहनिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर तसेच वर्तमानपत्रात घेतलेली परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे असे समजले जाईल. मुदतीत नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

कळावे. प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती,हजर केलेले दस्त व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ – धुळे, दि. ०८/०९/२०२६.

**अॅड.कमलेश राजेंद्र मोरे,** मो.९९२३४९०४६९
प्लॉट नं. २८, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड,धुळे ता. जि. धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे भोकर येथील गट नं. ३/३ पैकी, १) प्लॉट नं. १० चे एकूण क्षेत्र ८५ चौ. मी. चा बखळ प्लॉट, त्यासी चतु:सिमा पुर्वेस : ९ मी. रस्ता, पश्चिमेस : गट नं. ३/२, उत्तरेस : प्लॉट नं. ९, दक्षिणेस : प्लॉट नं. ११, २) प्लॉट नं. ११ चे एकूण क्षेत्र ८५ चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यासी चतु:सिमा : पुर्वेस : ९ मी. रस्ता, पश्चिमेस : गट नं.३/२, उत्तरेस : प्लॉट नं. १०, दक्षिणेस : प्लॉट नं. १२ येणे वर्णनाचा आतील मिळकत ही श्री. मच्छिंद्र झिपरु पाटील रा.मु. पो. भोकर ता. जि. धुळे यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास,मिळकतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकती संबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायलयात दावा न्यायप्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदा पावती, विक्री पावती, खरेदी खत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज समजून आमचे आशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ – धुळे, दि. ०८/०९/२०२६.

**अॅड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग. नं.४ भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
मो.७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस तसेच सरकारी, निमसरकारी, बँका, संस्था, पतसंस्था वगैरे तसेच मदरसा सिराजुल अुलुम मौलवी गंज धुळे यांचे ट्रस्टी यांना आमचे अशिल श्री. मोहन तुळशिराम नवले रा. साने गुरुजी सोसायटी जवळ, रेल्वे स्टेशनमागे धुळे यांचे कडून आमचे मार्फत या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील शेतजमीन सर्व्हे ५३१/२ चे क्षेत्र ० हे. २२ आर तसेच शेतजमीन सर्व्हे नं. ५३१/४ चे क्षेत्र ० हे. २३ आर या मिळकती संदर्भात आमचे अशिलाने मिळकत मालक मदरसा सिराजुल अुलुम मौलवीगंज, धुळे यांचे तत्कालीन ट्रस्ट १. मो. अबुलास हाफीज अ. कैय्युम, २. हाजी समसुलहक हाफीज मो. सिद्दीकी, ३. हाजी वकील अहमद हाजीलाल मोहम्मद, ४. हाजी रहमतुल्ला निजामोद्दीन, ५. मो. आबीद हाजी मो. आरीफ यांचेशी वर नमूद मिळकती संदर्भात दि. ११/०९/१९९६ रोजी रक्कम रुपये १,३१०००/– किंमतीला सदर मिळकती खरेदी देणेबाबत सौदा केलेला होता. सदर सौद्यापोटी बयाणा म्हणून आमचे अशिलाने रक्कम रुपये ३२,७५०/– धुळे जिल्हा मध्यवर्ती को. ऑप बँक धुळे या बँकेचा चेक क्र. ८२८१४ अन्वये अदा केलेले होते व आहे.

परंतु आमचे अशिलास नुकतेच लक्षात आले आहे की, मदरसा सिराजुल अुलुम मौलवीगंज धुळे हे सदर मिळकत वृत्तपत्रात जाहिरात देवून परस्पर त्रयस्तास विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत वर नमूद प्रमाणे आमचे अशिलाच्या सौदा कराराप्रमाणे मिळकतीत हितसंबंध आहे व सदर सौदा कराराच्या पुर्ततेकरीता आमचे अशिल लवकरच कायदेशीर कार्यवाही करणार आहेत.

सबब या नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकती संदर्भात मिळकत मालक मदरसा सिराजुल अुलुम मौलवी गंज धुळे यांचेशी कोणीही काहीही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर राहील व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि.४/०९/२०२६

**अॅड.विनोदकुमार आर.वर्मा**
ऑफिस : चेंबर नं.१०४, अॅडव्होकेटस चेम्बर्स बिल्डींग, जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

## जाहीर नोटीस

श्रीमती बायजाबाई तुकाराम खांडेकर, आरस्तोलबाई संजय पाटील, अलकाबाई योगेश पाटील, लिलाबाई आप्पा पाटील, दिनेश गोविंद पाटील, ध्रुपदाबाई लोटन पाटील, बापू भटू पाटील, मंगलाबाई तानाजी पाटील, मिनाबाई एकनाथ पाटील, लक्ष्मीबाई गोविंद पाटील, संजय लोटन पाटील, सिंधुबाई नारायण पाटील,सुनिताबाई रविंद्र पाटील, इंदुबाई सोमनाथ सुर्यवंशी, नंदाबाई एकनाथ पाटील, भटू एकनाथ पाटील, लोकेश एकनाथ पाटील, अनुसयाबाई जगन्नाथ मासुळे, प्रविण जगन्नाथ मासुळे, रविंद्र जगन्नाथ मासुळे, रा.पुरमेपाडा, ता.जि.धुळे यांचा गट नं. १९८/१/अ क्षेत्र १ हे. २० आर. त्याचे निम्मे क्षेत्र ६६ आर या मिळकतीशी अगर संपूर्ण मिळकतीशी आपला काही एक संबंध नाही कब्जा नाही.

आमचे अशिल १) सौ. सुनिता गणेश मोरे रा. रामालय,ग. नं.४, धुळे वगैरे १ यांनी गट नं. १९८/२ व गट नं. २००/१ या मिळकती दि. २५/११/२०१६ रोजी रजि. खरेदीखताने खरेदी केला असून ताबा त्यांच्याकडे आहे. हल्लीचे दुसरे मालक किशोर हरिचंद्र शिंदे व स्मिता किशोर शिंदे हे असून नोटीसीत नमूद मिळकत ही आमच्या अशिलांची मिळकत दाखवून आपण खरेदीचा व्यवहार करुन आमचा अशिलांच्या मिळकतीवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे ते सर्वस्वी गैर, बेकायदेशीर व निषिद्ध आहे. आमच्या अशिलांची तीव्र हरकत आहे. आपण आपल्या दि. २८/०८/२०२६ च्या श्री. मयुर बैसाणे यांच्या जाहीर नोटीसीवरुन केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर ठरेल व आमचे अशिल आपल्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी कारवाई करतील हे जाहीर नोटीसीस उत्तर असे.

दिनांक ०८/०९/२०२६, धुळे

**अॅड.पी.सी.पवार**
ग. नं. १४, सुभाष नगर, जुने धुळे, धुळे

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँक, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद परिशिष्टातील बखळ प्लॉट **श्री.उत्तम बळीराम पाटील** रा. धाडरी, ता. जि. धुळे यांचे मालकी हक्काचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी खालील परिशिष्टातील चतु:सिमांकीत बखळ प्लॉट आमचे अशिलांना कायमस्वरुपी विक्री करण्याचा सौदा केलेला असून बेणे स्विकारलेले आहे.

तरी खालील नमूद परिशिष्टातील मिळकतीमध्ये कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क, व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र ८ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** मौजे लळींग ता. जि. धुळे येथील गट नं. ७३/१/२/३ पैकी प्लॉट नं. २३ एकूण क्षेत्र १५३.७५ चौ. मी. यापैकी आमचे अशिलास विक्री करण्याचा सौदा केला ते दक्षिणेकडील भागाचे अविभक्त क्षेत्र ७६.८८ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा : पुर्वेस : गट नं. ७८, पश्चिमेस : वापर व रस्ता, दक्षिणेस : गट नं. ७३/४, उत्तरेस : याच प्लॉटचा उर्वरित भाग, ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे. दि. ०७/०९/२०२६.

**अॅड.सुभाष जी. विसपुते** मो.९७३०८ ०३५००
अॅडव्होकेट व नोटरी
६-अ, यशोदाई विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवनजवळ, स्टेशन रोड, धुळे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे धुळे येथील ५३५/१+५३५/२अ+५३५/२ब या पैकी प्लॉट नं. १५ चे एकूण क्षेत्र १७०.६२ चौ. मी. बखळ प्लॉट यास लागू विस्तारीत सि. स. नं. ४३९०/ब/क/ड पैकी प्लॉट नं. २६ चे एकूण क्षेत्र १७०.६२ चौ. मी. बखळ प्लॉट..

यासी चतु:सिमा

| दिशा | | चतु:सिमा | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | :सि. स. नं.४३९०/ब/क/ड/५९ | पश्मिेस : | ९ मीटर रुंदीचा रस्ता |
| दक्षिणेस: | सि.स. नं. ४३९०/ब/क/ड/२५ | उत्तरेस : | १२ मीटर रुंदीचा रस्ता |

येणे प्रमाणे वर्णनाची आतील बखळ प्लॉट १. श्री. रुपेश शांताराम भामरे व २.महेश शांताराम भामरे दोघे रा. भामर पेठ गांव, गल्ली नं. ४, धुळे ४२४००१ यांचे मालकीचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी सदरहू बखळ प्लॉट कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिल यांना सदर बखळ प्लॉटचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉटच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर बखळ प्लॉट संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरचा बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०८/०९/२०२६

**अॅड.चेतन महादु यादव** मो. ९६८९१२४६९२
ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र. ल. ता. जि. धुळे येथील गट नं. १५८/१ पैकी प्लॉट नं. १५ चे एकूण क्षेत्र २९० चौ. मी. यांस वि. सि. स. नं. ३३३१ चे एकूण क्षेत्र २८४.१० चौ. मी. सत्ता प्रकार क या पैकी पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र १४५ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : याच प्लॉट नं. १५ पैकी उर्वरित भाग, पश्चिमेस : प्लॉट नं. १६, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ८ ब, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **वैशाली भिकन वाबळे**, रा. वणी दिंडोरी (सप्तशृंगी गड) ता. कळवण, जि. नाशिक यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्रीमती कविता आबासाहेब खैरनार रा. पंजाबी कॉलनी मागे, मोहाडी उपनगर, धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०८/०९/२०२६

**अॅड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस नि.६

### महाशय दिवाणी न्यायाधिश साो. (कनिष्ठ स्तर) शिरपूर यांचे कोर्टात

किरकोळ दिवाणी अर्ज नं. ८०६/२०२६

**श्री. विश्वास बाबुराव गायकवाड, वगैरे** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... सामनेवाला
**कै. सुभाबाई बाबुराव कोकणी** ... मयत

**अर्ज : दि बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम ८ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेबाबत**

मयत सुभाबाई बाबुराव कोकणी या सांगवी ता. शिरपूर जि. धुळे येथीलच कायमचे रहिवासी होत्या व त्या ता. १६/०८/२०२५ रोजी सांगवी ता. शिरपूर जि. धुळे येथेच मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ श्री. विश्वास बाबुराव गायकवाड हा मुलगा आहे. तसेच अर्जदार नं. २-अ श्रीमती लक्ष्मीबाई संभाजी गायकवाड, २-ब श्री. संदीप संभाजी गायकवाड, २-क श्री. कृष्णा संभाजी कोकणी, व २-ड सौ. कौशल्या युवराज भोये हे मयत सुभाबाई बाबुराव कोकणी यांचा मयत मुलगा श्री. संभाजी बाबुराव गायकवाड यांची पत्नी, २ मुले व १ मुलगी म्हणजेच मयत सुभाबाई बाबुराव कोकणी यांची सुन, २ नातु व १ नात आहेत. मयत सुभाबाई बाबुराव कोकणी यांचा मयत मुलगा संभाजी बाबुराव गायकवाड हे ता. ०६/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयत सुभाबाई बाबुराव कोकणी यांचे पती नामे बाबुराव राघो कोकणी हे. २०/०७/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच मयताचे वारस असल्याबाबत त्यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅट १८२७ कलम ८ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेबाबत म. दिवाणी न्यायाधिश साो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि. २८/९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकिलामार्फत म. दिवाणी न्यायाधिश साो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे कोर्टात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या किरकोळ दिवाणी अर्जाचे कामी वर नमूद तारखेस हरकत घेणार कोणीही व्यक्ती स्वत: अगर आपल्या वकीलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काही एक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

आज ता. १९/८/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

सही... **कामगिरी कारकून** (म.दि.न्या.क.स्तर, शिरपूर) — कोर्टाचा शिक्का — सही... **अधिक्षक** (म.दि.न्या.क.स्तर, शिरपूर)

## जाहीर नोटीस नि.१४

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज साो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं. ५५८/२०२६

**१) गोखर्या रेहजा उर्फ रेहंजा पावरा, २) केसराम रेहेजा उर्फ रेहंजा पावरा,**
**३) भरत रेहज्या उर्फ रेहंजा पावरा, नं. १ ते ३ रा. जोयदा ता. शिरपूर**
**४) शिवाजी रेहजा उर्फ रेहंजा मन्नू पावरा, (मयत) वारस,**
**४अ) रेशमाबाई शिवाजी पावरा,**
**४ब) दिलवरसिंग शिवाजी पावरा, रा. नं. ४अव ४ब रा. जोयदा ता. शिरपूर**
**४क) उषाबाई लालचंद पावरा, रा. चिखली पो. बलवाडी तह-वरला**
**४-ड) धमरमसिंग शिवाजी पावरा, (मयत)**
**४-ड-१) गुड्‌दिबाई धरमसिंग पावरा, ४-ड-२) जयेश धरमसिंग पावरा,**
**४-ड-३) खुशाल धमरमसिंग पावरा, ४-ड-४) प्रिया धरमसिंग पावरा,**
४-ड-१ही स्वत:साठी व ४-ड-४) ची अ.पा.क. आई म्हणून
नं. ४-ड-१ ते नं. ४-ड-४) जोयदा ता. शिरपूर जि. धुळे. ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार गोखर्या रेहजा उर्फ रेहंजा पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे रेहंजा उर्फ रेहजा मन्नू पावरा हे दि. १२/०१/२०२३ रोजी मौजे जोयदा ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार यांने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे रेहंजा उर्फ रेहजा मन्नू पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २८/९/२०२६ रोजी ठिक १०.३०वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर — कोर्टाचा शिक्का — सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज साो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७९५/२०२६

**१) मुनीबाई राजेंद्र पावरा, २) कविता प्रभू पावरा,**
**३) रवीना प्रभू पावरा, ४) संजना प्रभू पावरा,**
**५) वंदना प्रभू पावरा, ६) आकाश प्रभू पावरा,**
**७) आराध्या प्रभू पावरा,**
अ.नं. २ ही स्वत:साठी व अ.नं. ३ ते ७ ची अ. पा. क. आई म्हणून
सर्व रा. टेंभेपाडा ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार मुनीबाई राजेंद्र पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे प्रभू राजेंद्र पावरा, हे दि. १८/०७/२०२६ रोजी मौजे टेंभेपाडा ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे प्रभू राजेंद्र पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २९/९/२०२६ रोजी ठिक १०.३०वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

सही... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

पान १ वरुन

## पंधरा पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही

वेगळी भूमिका आणि त्यानंतर वेगळी वक्तव्ये केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकारने स्पष्ट निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीवर प्रतिक्रिया**

नाशिक येथे मराठा क्रांती मोर्चाच्या झालेल्या बैठकीबाबतही जरांगे-पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. या बैठकीतील भूमिकेवर सध्या भाष्य करणार नसल्याचे त्यांनी सांगितले. संबंधितांकडून आपल्यावर टीका झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात राधाकृष्ण विखे-पाटील यांची भूमिका काय आहे, याबाबतही जरांगे पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला.

**भरत गोगावले यांना इशारा**

मंत्री भरत गोगावले यांनी एकेरी भाषेचा वापर केल्यास जशास तसे उत्तर देऊ, असे म्हटले होते. त्यावरही जरांगे-पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. मी तयार आहे, कधीही सज्ज आहे. माझ्या नादाला लागू नका. माझ्याकडे पुरावे आहेत आणि ते मी माध्यमांसमोर देईन, असे जरांगे-पाटील म्हणाले. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकारमधील नेत्यांनी जबाबदारीने भूमिका घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. तुम्हांला आरक्षण द्यायचे नसेल आणि त्यावर बोलू नका, असे सांगायचे असेल तर शिष्टमंडळाने अंतरवालीत येऊ नये. आमचे प्रश्न सोडवायचे नसतील तर अंतरवालीत येऊ नका, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले. दरम्यान, सरकार आणि मनोज जरांगे-पाटील यांच्यात मागण्यांवर चर्चा सुरू असताना दोन्ही बाजूंकडून वेगवेगळे दावे करण्यात येत असल्याने मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

## पंतप्रधानांच्या कार्यक्रम स्थळी सुरक्षेचा भंग

कार्यक्रमस्थळी वावरत होता. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने सुरक्षा रक्षक आणि पोलिसांनी त्याची तपासणी केली. यावेळी त्याने दाखवलेले पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र बनावट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याचे सांगण्यात येत आहे.

**सोबत खासगी बॉडीगार्ड**

रोहन पारेख एकटाच कार्यक्रमस्थळी आला नव्हता. त्याच्यासोबत एक खासगी बॉडीगार्ड असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या बॉडीगार्डकडे बंदूक आढळल्याची माहिती आहे. त्यामुळे पंतप्रधानांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरक्षा तपासणी आणि प्रवेश व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**पोलिसांकडून तपास सुरू**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था आणि विशेष सुरक्षा गटाच्या प्रोटोकॉलला विशेष महत्त्व असते. अशा परिस्थितीत बनावट ओळखपत्राचा वापर करून एखादी व्यक्ती कार्यक्रमस्थळाच्या परिसरात कशी पोहोचली आणि तिच्यासोबत बंदूकधारी व्यक्तीला प्रवेश कसा मिळाला, याचा तपास सुरक्षा यंत्रणांकडून केला जात आहे. पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील नेमकी पार्श्वभूमी आणि सुरक्षेतील त्रुटींबाबत तपासानंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

## डीजे, लेझर लायटिंगवर कायमस्वरूपी बंदीची मागणी

नमूद केल्यानुसार डीजेच्या कर्णकर्कश आणि मोठ्या आवाजामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे. विशेषतः वृद्ध नागरिकांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता, तर अनेक नागरिकांना कानाच्या समस्या निर्माण होऊन कायमस्वरूपी बहिरेपणाचा धोका संभवतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली. डीजे मानवी आरोग्यासाठी धोकादायक असल्याचेही समितीने नमूद केले आहे. याशिवाय डीजेसोबत वापरण्यात येणाऱ्या लेझर प्रकाशझोतामुळे नागरिकांच्या डोळ्यांवरही विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी समितीकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे डीजेसोबतच लेझर लायटिंगवरही निर्बंध घालण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षीही धुळे शहरातील कर्णविकार तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह याच स्वरूपाचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले होते. मात्र गणेशोत्सवाच्या काळात पुन्हा मोठ्या प्रमाणावर डीजे व डॉल्बीचा वापर होत असल्याने समितीने यंदाही प्रशासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधले आहे. गणेशोत्सव आणि इतर उत्सवांमध्ये डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करण्यासाठी गणेश मंडळांना प्रवृत्त करावे, तसेच सर्व गणेश मंडळांच्या अध्यक्षांची तातडीने बैठक घेऊन न्यायालयीन आदेश व ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियमांची माहिती द्यावी, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, काही गणेश मंडळे रस्त्यावर मंडप उभारून संपूर्ण रस्ता बंद करतात. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो. मंडप उभारण्यासाठी आवश्यक जागा ठेवून वाहतुकीसाठी किमान एक-दोन चारचाकी वाहने जाऊ शकतील एवढा रस्ता मोकळा ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही समितीने केली आहे.

मुंबई उच्च न्यायालय व राज्य सरकारच्या आदेशांची धुळे जिल्ह्यात कायमस्वरूपी अंमलबजावणी करावी, सर्व नोंदणीकृत गणेश मंडळांच्या अध्यक्षांची बैठक घेऊन त्यांना आदेशाबाबत सूचित करावे, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि रस्ता पूर्णपणे बंद करणाऱ्या मंडळांना वाहतुकीसाठी रस्ता सोडण्याचे निर्देश द्यावेत, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदन देताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय बगदे, ॲड. चंद्रकांत येशीराव, ज्येष्ठ पत्रकार पप्पू सहानी, बिपिन अमृतकर, संदीप शेवतकर, श्रीकृष्ण बेडसे, रामकृष्ण शिंदे, मुकेश गुप्ता, सचिन सोनवणे, भगवानबापू वाघ, किशोर बोरसे, देविदास शिरुडे, चंद्रकांत सैंदाणे आणि मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर उपस्थित होते.

## गळफास घेवून एकाची आत्महत्या

याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. घटनेमागचे नेमके कारण समजू शकले नाही, हवालदार एस.ए. अहिरे तपास करीत आहेत.

## नवरात्रीसह रथोत्सवाच्या नियोजनासाठी

तसेच उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध समित्यांची जबाबदारी, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

श्री बालाजी संस्थानच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या धार्मिक उत्सवाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असतो. त्यामुळे यंदाचा नवरात्री उत्सव व रथोत्सव अधिक भव्य, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण बैठकीस श्री बालाजी भक्तांनी तसेच संबंधित कार्यकर्ते व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल व समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## उत्सावाच्या काळात लोडशेडिंग करू नका

व नवरात्रोत्सव काळात कोणत्याही प्रकारची अनावश्यक वीज कपात किंवा लोडशेडिंग करू नये, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी न.पा. पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, नगरसेवक धर्मेश पाटील, मनोहर गावीत, अल्तमस खाटीक, नाविद शहा, सोमित्र गावीत, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष मनोहर नगराळे, माजी उपनगराध्यक्ष फारुक शहा, अमृत लोहार, राजू आगळे, महेंद्र दुसाने, सेफ व्होरा, जयेश जयस्वाल यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. निवेदनावर सर्व नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान १ वरुन

## दोंडाईचात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विविध मार्गदर्शक सूचना मांडण्यात आल्या. बैठकीत अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी शहरात डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. मागील दोन वर्षांपासून दोंडाईचा शहरात अत्यंत शांततेत उत्सव साजरा होत आहे, ही शहरासाठी जमेची बाजू आहे. उत्सवादरम्यान जातीय व सामाजिक सलोखा टिकून राहण्यासाठी मंडळांनी सकारात्मक आणि प्रबोधनात्मक देखावे सादर करावेत. कोणाच्याही भावना दुखावतील असे देखावे टाळावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.उत्कृष्ट व प्रबोधनात्मक देखावे सादर करणाऱ्या मंडळांना पोलीस प्रशासनातर्फे बक्षीस देण्याबाबत चाचणी सुरू असून, यासाठी सर्वसमावेशक कमिटी नेमली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

बैठकीत सार्वजनिक ठिकाणी लावल्या जाणाऱ्या बॅनरवर छपाई करणाऱ्याचे नाव व मोबाईल नंबर असणे बंधनकारक आहे. गणेश मूर्तीजवळ २४ तास स्वयंसेवक उपस्थित असावेत व शक्य असल्यास मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. वर्गणी गोळा करताना दात्याच्या इच्छेनुसारच ती स्वीकारावी. वर्गणीसाठी जोर-जबरदस्ती केल्यास कठोर कारवाई केली जाईल. शहरातील रस्ते त्वरित दुरुस्त केले जातील, आवश्यक तेथील स्पीड ब्रेकर काढले जातील आणि रस्ते दिव्यांची सोय केली जाईल, असे आश्वासन पालिका अभियंता व नगरसेवकांनी दिले. टाकरखेडा पुलाजवळील गणेश विसर्जन स्थळावर रात्रीच्या वेळी प्रखर उजेड देणारे दिवे आणि सुरक्षेसाठी विशेष पथक तैनात केले जाईल. अशा सुचना देण्यात आल्या. तसेच स्टेशन भागात पोलीस चौकी उभारण्यासाठी जागा उपलब्ध असून, तेथे चौकी झाल्यास प्रवाशांची लूटमार व भुरट्या चोऱ्यांना आळा बसेल, असा मुद्दा नगरसेवक प्रवीण महाजन यांनी मांडला.

या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे, पालिका गटनेते निखिल जाधव, मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, शिंदखेडा तहसीलदार कोळी, शहर अभियंता शिवानंद राजपूत, नगरसेवक राजन ढोले, रामभाऊ माणिक, जितेंद्र गिरासे, विजू मराठे, हितेंद्र महाले, कृष्णा नगराळे,नरेंद्र गिरासे,भरतरी ठाकूर, अक्षय चव्हाण ,भाजप शहराध्यक्ष जितेंद्र गिरासे यांच्यासह शहरातील दादा, बाबा, वीर भगतसिंग आदी प्रमुख गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांनी शहराच्या डीजेमुक्त उपक्रमाचे स्वागत केले. बैठकीची प्रस्तावना पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे यांनी केली.बैठकीच्या यशस्वीतेसाठी पो. कॉ. अविनाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शिरपूर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या

वनावल व टेंभे बु. ,नागरिकांचा मागास प्रवर्ग : अहिल्यापूर, चांदपुरी, नवे भामपूर, सुभाषनगर, आढे, पिळोदे, साकवद, वरुळ, आमोदे, बलकुवे-मुखेड, बोरगाव, नांथे, मांजरोद, कळमसरे, कुवे व शिंगावे., सर्वसाधारण : सावळदे, भोरखेडा, लोंढरे, ताजपुरी, करवंद, उंटावद, अजंदे खुर्द, बाभूळदे, जवखेडा, गरताड, वाठोडे, तरडी, खर्दे पाथर्डे, घोडसगाव, दहिवद, भाटपुरा, मांडळ, खामखेडा प्र. था., असली तांडे, जुने भामपूर, कुरखळी, जातोडे, पिंपळे, सावेर गोदी, भरवाडे, तऱ्हाडी त. त., पिंप्री, जैतपूर, बाळदे, ऊपरपिंड, तोंदे, खर्दे व हिंगोणी बु. आदींचा समावेश आहे.


सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

विकणे आहे
१) देवपूर आग्रारोड, हिम हॉटेलचेमागे, हॉस्पिटल किंवा अपार्टमेंट बनविणेसाठी उपयुक्त असा सिटीएस क्र.४९७५ क्षेत्रफळ ५४७५ चौरस फुटाचा प्लॉट.
२) गोंदुर विमानतळ रोड टच मौजे गोंदुर, गट नं.५५/३बी प्लॉट नं.१ क्षेत्रफळ ६७४० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9420602255/9422285483

पाहिजेत
होलसेल मेडिकल दुकानासाठी
१) कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला)- जागा २
२) हेल्पर - जागा १
३) सेल्समन- जागा २
-: समक्ष भेटा :-
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे.

पाहिजेत
लॉजिंग कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे.
आकर्षक पगार दिला जाईल.
-:समक्ष भेटा:-
राजेंद्र लॉज
ग. नं. २, धुळे

पाहिजेत
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8888096777

पाहिजेत
१) प्रिटींग मशिन हेल्पर
२) ग्राफिक डिझायनर
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊसजवळ, साक्रीरोड, धुळे.
मो.8087524209


पान १ वरुन

## आ.अनुप अग्रवालांच्या हस्ते रस्ता कामाचा

नगरसेविका प्रियंका बोरसे, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, ऋषीकेश ठाकरे, प्रवीण अग्रवाल, कामाचे सूचक नगरसेवक योगेश ईशी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

प्रभाग क्र.८ सह संपूर्ण धुळे शहराचा नियोजनबद्ध आणि शाश्वत विकास करण्यासाठी आवश्यक त्या विकासकामांना प्राधान्य देत कामांना गती दिली जात आहे. नागरिकांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन विकासाचा हा प्रवास सातत्याने सुरू राहील, असे यावेळी सांगण्यात आले.

## सावऱ्यादिगरजवळील वळणार

जखमींना उपचारासाठी धडगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी रुग्णालय परिसरात नातेवाईकांची मोठी गर्दी झाली असून, आपल्या आप्तस्वकीयांच्या प्रकृतीची माहिती जाणून घेण्यासाठी नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळाला. जखमींमध्ये गिता चंद्रसिंग पावरा, रायदास पावरा, सोनहि मोहन पावरा, दिनेश भोग्या भिल, जितान पावरा, रतन जोरदार पावरा, चिकला किला पावरा, किसन सान्या पावरा, दांड्या जान्या पावरा, जया टेकला पावरा, रुईला दमन्या पावरा, मगन पाडवी, सांगा पावरा, टेट्या पावरा, गिदार पावरा, जितेंद्र पावरा, केला पावरा, वंदना पावरा, सुनिल पावरा, गुंड्या पावरा, रोहिदास पावरा, शांतिलाल पावरा यांचा समावेश आहे.

## लाचखोर तलाठी दिनेश दाभाडेसह

लाच मागितली. याप्रकरणी तक्रारदाराने घाबरून लागलीच आठ हजार रुपये दिले. धुळे एसीबीकडे तक्रार नोंदवली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. धुळ्यातील तहसील कार्यालयाच्या आवारात आज दुपारी संशयीत खासगी पंटर जयेश चौधरी याने बारा हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारली. ती रक्कम तलाठी दाभाडे याच्याकडे दिली. त्यानंतर दोघांना पाळत ठेवलेल्या पोलीस पथकाने अटक केली. धुळे एसीबीचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी कारवाई केली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. लाच प्रकरणात आणखी एका अधिकाऱ्याचा सहभाग असल्याचाही शक्यता असून त्याची माहिती पोलीस घेत आहेत.

## कंत्राटदाराच्या घरासमोर उभ्या असलेल्या नव्या कचरा

कचरा संकलनाचा प्रश्न केवळ राजकारणाचा नसून धुळेकरांच्या आरोग्याचा, स्वच्छतेचा आणि मूलभूत सुविधांचा आहे , हे आयुक्तांनी लक्षात घेऊन कचरा ठेकेदाराच्या घरासमोर उभ्या असलेल्या वाहनांबदल चौकशी करावी? ज्या भागात चार-पाच दिवसानंतर घंटागाडी येत नाहीत त्या भागाचा आढावा घ्यावा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी,निंबा मराठे, महानगर प्रमुख धीरज पाटील, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, शेखर वाघ, अण्णा फुलपगारे, शिवाजी शिरसाळे, प्रशांत ठाकूर, डॉ. अनिल पाटील, राजेंद्र ढवळे, सुनील पाटील, जव्हार पाटील, भूषण पाटील, दिलीप चित्ते, मुन्ना पठाण, सुभाष मराठे, संजय पाटील, दिनेश पाटील, अनिल चौधरी, महादू गवळी, कपिल लिंगायत, हिमांशू परदेशी, नितीन देशमुख, रामदास कानकाटे, पंकज भारस्कर ,नितीन जडे ,सागर निकम, अजय चौधरी, निलेश कांजरेकर, संदीप चौधरी,आबा हरळ यास सर्व शिवसेना विभाग प्रमुख व शिवसेना पदाधिकारी यांनी केली आहे.

## शेवाळी-दातर्ती मार्गावर स्कूलबसला धडक

आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य दिनेश देवरे तसेच गंगामाता कन्या विद्यालयाचे शिक्षक मुकेश साळुंके यांनी घटनास्थळी तात्काळ मदतकार्य केले. त्यांनी पालकांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली तसेच जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी सहकार्य केले.

या स्कूलबसद्वारे दातर्ती व धमनार येथील विद्यार्थी साक्रीतील गुरुवर्य प्राथमिक शाळा, आंबेडकर विद्यालय तसेच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षणासाठी ये-जा करतात. यामध्ये पहिली ते चौथीतील चिमुकल्यांचा समावेश होता. शाळा सुटल्यानंतर घरी परतत असताना हा अपघात घडल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने कोणालाही गंभीर दुखापत झाली नसली तरी या घटनेमुळे चिमुकल्यांना मानसिक धक्का बसल्याचे दिसून आले.

## चार शेतातून वायर लंपास

धुळे, दि.८- आनंदखेडा (ता. धुळे) शिवारात शेतातील सौरपंप, वीजपंपांना जोडलेल्या तांबे, ॲल्युमिनियमच्या वायर चोरट्यांनी लंपास केली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला. आनंदखेडा येथील शालीग्राम रविंद्र खैरनार (४६) यांचे गाव शिवारात शेत आहे. त्यांच्या शेतातील वीजपंप व परिसरातील विविध शेतांमधून चोरट्यांनी वायर चोरुन नेली. तांबे, ॲल्युमिनियम वायर तसेच आत्माराम रायते यांच्या सौरपंपाची कॉपर वायर लंपास केली. रविंद्र गवळी यांच्या विज पंपची तांब्याची वायर, कैलास गवळी यांच्या शेतातील वीज पंपाला ॲल्युमिनियम वायरही लांबावली. या सर्व चोरीस गेलेल्या वायरची किंमत ३९ हजार रुपये आहे. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. रविवारी ६ सप्टेंबरला रात्री चोरीचा प्रकार घडला. एकाच रात्री चारही शेतकऱ्यांच्या शेतातून वायर चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती व्यक्त होत आहे.

### निधन वार्ता

## मथुराबाई मराठे



शहादा,दि.८- तालुक्यातील म्हसावद येथील मथुराबाई रामदास मराठे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, बहीण, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या लक्ष्मण मराठे, ताराचंद मराठे यांची मातोश्री होत.


गणपती बाप्पा मोरया
बाप्पाच्या आवडीचे मोदक
फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ (अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक
मदर्स किचन
फुलवाला चौक धुळे.
9049902201
7887750864

पाहिजेत
आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये कर्मचारी पाहिजेत.
साफसफाईसाठी :-
२ स्त्री, २ पुरुष
कम्पाउंडर आणि पंचकर्मासाठी:-
२ पुरुष, ३ स्त्री
पत्ता : डॉ.जगताप यांचे लताकुसुम हॉस्पिटल, गल्ली नं. ६, भांग्या मारुती चौकाजवळ, जयप्रकाश चौक, धुळे
फोन 9422269550


पान १ वरुन

## अडूसष्ट ग्रा.पं.च्या सरपंचपदांचे आरक्षण जाहीर

झाल्या आहेत. तसेच नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी कासारे, भडगाव (व), तामसवाडी, धाडणे, गणेशपूर, हट्टी (बु.)/घाणेगाव, नांदवण/कोकले, चिंचखेडे, फोफादे, निजामपूर, वाजदरे, अंबापूर, छडवेल (प.), ऐंचाळे, बेहेड, दुसाणे, काळगाव आणि सैयदनगर/इच्छापूर या १८ ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षित करण्यात आले आहे.

३५ ग्रामपंचायतींचे सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी भामेर, खोरी, प्रतापपूर, भाडणे/गोंदास, उभंड, उंभर्टी, नवडणे/सायणे, फोफरे, म्हसाळे, इंदवे, भागापूर, सातरपाडा, दातर्ती/गंगापूर, दिघावे, कावठे, वर्धाणे, हट्टी (खु.), वेहेरगाव/रोजगाव, ककाणी/भडगाव, आखाडे, महिर, शेवाळी मा., उभरांडी/होडदाणे, छाईल, शेवाळी दा., कढरे, जैताणे, खुडाणे, मालपूर, धमणार, जामदे, उंभरे, छावडी/आमोदे, दारखेल आणि सतमाने या ३५ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

आरक्षण निश्चित झाल्याने आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, कोणत्या गावात कोणता उमेदवार पुढे येणार, कोणत्या गटाला कोणाचा पाठिंबा मिळणार आणि पॅनेलची बांधणी कशी होणार, याबाबत गावागावांत चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

**आरक्षणाचा संक्षिप्त आढावा**

अनुसूचित जाती -३, अनुसूचित जमाती -१२, नागरिकांचा मागास प्रवर्ग -१८, सर्वसाधारण -३५

**आरक्षणाने इच्छुकांची धावपळ वाढणार**

सरपंचपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवारांचे चित्र आता अधिक स्पष्ट होणार आहे. विशेषतः सर्वसाधारण प्रवर्गातील ग्रामपंचायतींमध्ये संभाव्य उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता असून, मतदारांशी संपर्क, समर्थकांची जुळवाजुळव आणि पॅनेल उभारणीच्या हालचालींना वेग येऊ शकतो.

**निवडणुकीपूर्वीच गटबाजीला रंग**

आरक्षणामुळे अनेक गावांतील स्थानिक राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. सरपंचपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित झाले, यावर अनेक इच्छुकांचे राजकीय भवितव्य अवलंबून होते. आता आरक्षण स्पष्ट झाल्याने स्थानिक गट, आघाड्या आणि संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू होण्याची चिन्हे आहेत.

## कॉ. किशोर ढमाले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली होती. कष्टकरी आदिवासी शेतकऱ्यांच्या हितासाठी जनसंघर्ष उभा करण्याचे काम त्यांनी ज्येष्ठ नेते एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वात त्यांनी केले आहे. कष्टकऱ्यांनी लोकवर्गणीतून बांधलेल्या सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा आणि सत्यशोधक शेतकरी सभेच्या दहिवेल (ता, साक्री) नवापूर (जि. नंदुरबार) येथे कार्यालय निर्माण करून त्यांनी लढा कायम ठेवला. शोषितांना संघर्षाच्या वाटेवर घेऊन अथकपणे ढमाले यांचे काम सुरू आहे. त्यासाठी त्यांना आज वाढ दिवसाचे औचित्य साधून अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

## ५२ वे पुण्यस्मरण



**कै.छोटूनाना उर्फ पंडीत रंगनाथ बडगुजर**

(स्वर्गवास : दि. ९/९/१९७४)

राहील आठवण सदा तुमची लाभो तुमच्या आत्म्यास शांती हीच विनंती परमेश्वरासी तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली व सुमनांजली.

--------: शोकाकुल :--------

श्री.सुभाष पंडीत श्री.संजिव पंडीत श्री.मनोज पंडीत (मुले)
श्रीमती कुसूम विजय (सुन) सौ. कल्पना सुभाष (सुन)
सौ. माधुरी संजिव (सुन) सौ. वंदना मनोज (सुन)
सौ. शालिनी सुरेश (बहिण) सौ. जयश्री पुरुषोत्तम (बहिण)
नातु-रितीकेश,भुषण,अमोल,विशाल, वैभव, धनंजय, चेतन, शुभम
सौ. प्रिती अनिलराव (नात) सौ. प्रिया विनायकराव (नात)
सौ. पुजा राहुलराव बडगुजर (नात)
सौ. कल्पना रितीकेश (नातसुन) सौ. सपना भुषण (नातसुन)
सौ. कामिनी अमोल (नातसुन) सौ. रुपाली विशाल (नातसुन)
सौ. साईली धनंजय (नातसुन) सौ. वैशाली चेतन (नातसुन)
सौ.अंकिता शुभम (नातसुन)

**समस्त रघुवंशी परिवार**


गरम पाण्याचा एकच उपाय...
BAJAJ Crompton Racold USHA



गॅस गिझर
आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
* मॉडेल अनुसार
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०